# स्त्रीपुरूष तुलना.

अथवा

स्त्रिया व पुरूष यांत साहसी कोण हें स्पष्ट करून
दाखविण्याकरितां हा निबंध

## ताराबाई शिंदे यानीं रचिला.

**बुलठाणें.**
प्रांत वऱ्हाड.

पुणें येथें
‘श्री शिवाजी’ छापखान्यांत छापिलें.
सन १८८२ इ०

किंमत ९ आणे.

# श्रेय:


| | |
|---|---|
| टंकन : | निमा शिंगारे |
| मुद्रितशोधन : | राह्उल प्रकाश सुवर्णा |
| ओळख : | सुहास शिंगारे |
| मुखपृष्ठ (पूर्वीसारखे): | सुहास शिंगारे |

# ओळख

कै. ताराबाई शिंदे यांचा कालखंड अंदाजे १८५० ते १९१०. या काळखंडात स्त्री शिक्षणाचा प्रसार अत्यल्प. त्यातही लिहिणाऱ्या शिक्षीत स्त्रियाचं प्रमाण ते किती ? आणि त्यांनी लिहलंच तर काय लिहणार ? पौराणिक गोष्टी. अशा कालखंडात 'स्त्री-पुरुष तुलने' सारख्या ज्वलंत सामाजिक प्रश्नावर ताराबाई शिंदे नामक मराठा स्त्रीने लिहणे म्हणजे आश्चर्यच ! त्यांच्या लिखाणावरून त्या स्त्री-स्वातंत्र्याचा अनिर्बंध पुरस्कार करणाऱ्या वाटत नाहीत. त्यांच्या मते स्त्री ही गृहलक्ष्मी नसून बंदीस्त घरातील एक बटीक बनली आहे आणि याला कारण हिंदूची शास्त्रे.

पुरूषांनी परकीय मालाचा वापर सुरू केल्याने स्वदेशी रोजगार बुडून हरएक प्रकारचा व्यापारी व कसबी कारागीर लोक उपाशी मरू लागल्याचा उल्लेख करून ताराबाई शिंदेंनी (महात्मा गांधीच्या कितीतरी आधी) स्वदेशीचा पुरस्कार केला आहे. त्यांच्या मते मराठा समाज ब्राम्हणांपेक्षा अधिक कर्मट आहे. हे आजही मराठा समाजाला लागू होते.

ताराबाई शिंदे यांचे वाचन केवळ पोथ्यापुराणे किंवा समकालीन वृतपत्रे एवढया पुरतेच मर्यादित नव्हते तर तत्कालीन लोकप्रिय कथा-कादंबऱ्याही त्यांनी चिकित्सकपणे वाचल्या होत्या.

# प्रस्तावना

ज्या परमेश्वरानें ही आश्चर्यकारक सृष्टि उत्पन्न केली, त्यानेंच स्त्रीपुरूष निर्माण केले. तरी सर्व प्रकारचे साहास दुर्गुण स्त्रियांचेच अंगी वसतात किंवा जे अवगुण स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरूषांत आहेत किंवा नाहीत हे अगदी स्पष्ट करून दाखवावें याच हेतुने हा लहानसा निबंध मी माझ्या सर्व देशभगिनींचा अभिमान धरून रचिला आहे. यांत अमुकच जाती किंवा कुळ याकडे माझें मुळींच लक्ष नाही. स्त्रीपुरूषाची तुलना आहे.

तसेंच पुनर्विवाह ब्राम्हणांतच होत नाही असें कांही नाहीं. दुसर्‍या अवांतर पुष्कळ परभू, शेवणी, गुजराथी, भाटे, मारवाडी, मऱ्हाठे, देसाई, देशमुख, इनामदार, जहागिरदार, शिरके, महाडीक, जाधव, भोंसले, माने असे अनेक आडनांवाचे सोलापूर, सातारा, पुणे, ग्वाल्हेर, इंदूर, या प्रांती असे जे मराठे मऱ्हाठशाईला मरतात त्या त्यांचे कुळांत तर ब्राह्मणांपेक्षाही पुनर्विवाह न होण्याची सक्ती दिसून येते. या लोकांचे घराण्यांत तर प्राणांतीं असें होणार नाही. अशा उठून गेल्या तर जाऊं देतील, पण पुनः दुसरा नवरा कधींच करूं देणार नाहींत.

दुसरें, इंग्रज लोकांच्या चाली एक देशीच एकाच जातीत घेतल्यात असें नाही. सर्व जातींत राजेरजवाडयांत पोषाखाच्या चाली बदलून गेल्या आहेत. पूर्वीचे किनखापाचें ठाणचें ठाण, ते भरजरी बादली पोषाख, शिरपेंच मंदील, चंदेरी दुपेटे, पैठणी लफेदार पागोटें, नागपुरी धोतरजोडे, लालचटक नरम गादीचे चर्मी जोडे, हे कोठें लपले आतां ? नवऱ्यांनींच नवी तऱ्हा घेतली तेव्हां बायकाही त्याचप्रमाणें करण्यास पाहूं लागल्या. पण अजून त्या लोकांचे स्त्रियांप्रमाणें गवन घालण्याचा प्रघात पडला नाही. तरी अंगांत कोट, लांब बाहयाचें चुणीदार कुडतें, पायांत स्टाकिंग बुटापर्यंत येऊन पोहोचलें आहे.

गळयांत फक्त एक मंगळसूत्र घालतात, पण तेंही अगदी बारीक पोतीचा एकं सर मात्र. तसेंच कपाळीं कुंकूं जनलज्जेकरितां लावणें भाग म्हणून दोन्ही भोंवयामध्यें लावावयाचें. तेंही अगदीं मसुरिचे डाळिंबीपेक्षांही बारीक असून वर सारें कपाळ पांढरें फटफटींत राहूं द्यावयाचें. आतां जशी पुरूषांना गोफ, कंठी, कडें घालण्याची शरम वाटते, तशीच बायकांना देखील दागिन्यांची लाज वाटून अगदीं निव्वळ पार्वतीप्रमाणें तें रंगीबेरंगी लाल नाहीं तर पांढरे दोन सव्वादोन रूपयांचें पातळ नेसून व अंगात सफेत मलमलिची नाहीं तर छिटाची चोळी घालून रहायाची आवड वाटते. सारांश, सांप्रत सर्व पहिली सुदशा जाऊन आपल्या देशास आवदसा येऊं लागली. पांचपांचशें रूपयांचे शालू, पैठण्या गेल्या.

धनवड, नागपूर, बऱ्हाणपूर, सोलापूर, अहमदाबाद ह्या पेंठा लपल्या आणि त्यांच्याऐवजीं घरोघर हीं पातळाचे सोळा हात तुकडयाचीं निशाणें लागलीं.

या तुमच्या भिकार चाळयांनीं सर्व प्रकारचे आपले स्वदेशी रोजगार बुडून, हरएक प्रकारचे व्यापारी व कसबी कारागीर लोक उपाशी मरूं लागले. वैभव हाटत चाललें, लक्ष्मीला आपापल्या घरीं राह्न घेण्याकरितां जों जों तुम्ही आग्रह करतां तों तों ती तुमचे हे असले भिकार चाळे, भ्रष्टकार पाह्न कोसानेंकोर दूर देशाचाच रस्ता धरूं लागली. तर तुम्हाला विधवा स्त्रियांची व या गरीब कारागीर लोकांच्या मुलाबाळांची कनवळा येऊन तुम्ही आपल्या देशाकडे पुनः पहिल्यासारखी नजर फिरवून आपापले धर्म, चाली, देशरिवाज न सोडतां स्वदेशाभिमानी व्हावें, व सर्व प्रकारें स्त्रियांस दोषपात्र करून रसातळीं न घालावें म्हणून हा एक लहानसा निबंध तुम्हापुढें सादर केला आहे.

तरी मी निरंतर मऱ्हाठमोळयाचे अटकेंतली गृहबंदीशाळेतील मतिहीन अबला असून हा माझा पहिलाच प्रयत्न असल्यामुळें या निबंधांत असंगत व तुटक मजकूर अगदीं मऱ्हाठशाई जाडी भरडी व अतिशय कडक भाषा असते, पण रोज पुरूषांचे साहस, धाडस व दगाबाजींची नित्य नवीं भयंकर उदाहरणें दिसून येत असतांही तिकडे कोणीच लक्ष न देतां स्त्रियांवरच सर्व दोषांची गोणीं लादतात, हें पाह्न स्त्रीजात्याभिमानानें माझे मन अगदीं खळबळून तळतळून गेलें त्यामुळें मला निर्भीड होऊन असेंच खडखडीत लिहिल्यावांचून रहावेना. तुम्हीं एकासारखे सगळेच दगाबाज, कपटी आहात, तेव्हां तुम्हीं एकमेकांचे झाकून नेतां तें उघडें करून दाखविण्याला याच्याहीपेक्षां कडक जर दुसरे शब्द अगर भाषा असती तर ती देखील मी वाकडी तिकडी लिहिलीच असती. परंतु मी पडलें गौणपक्षाची म्हणून अनेक दोष आढळून येतील, व तुम्ही आपले विशाल बुध्दीचे जोरानें या निबंधावर कांही तरी टिका करून स्वजातीचें वर्णावरच सहजी करून दाखवाल, तरी माझ्या नजरेनें मला जसें दिसलें तसेंच येथें मी माझे सर्व उद्गार लिहिले आहेत. तेव्हां या माझ्या निबंधास लक्ष लावून वाचा किंवा याकडे अलक्ष्य करूं नका किंवा याला कांहीं आश्रय द्या, अशीसुध्दां मी तुम्हांस विनंती वगैरे कांहीं करत नाहीं. फक्त इतकेंच विचारतें कीं, माझें म्हणणें बरोबर आहे किंवा नाहीं हें तुम्ही जर खरे निःपक्षपाती असाल तर पुर्ता विचार करून यांत जें कांहीं कमी जास्त असेल तें निवडा. पण येऱ्हवी आपलीच बाणी राखण्याकरितां जर पुढें घोडें ढकलाल तर मात्र नाईलाज आहे. तरी सर्वदा स्वजाति-कल्याणार्थ झटून त्यांचे मनांत सदाचरणाचें बिजारोपण करीनच करीन. कळावें.

- ताराबाई शिंदे

# स्त्री–पुरुष तुलना

आलींकडे सर्व वत्तमानपत्रांत गरीब अबलांच्या दुष्कृत्यांविषयीं बरेंच छापून येतें, तरी हा महा अनर्थ मिटवून टाकण्यात तुम्ही कोणीच पुढें होत नाही याचें कारण काय बरें ?

अहो, पुनर्विवाह न करण्याची चाल महान रोगांप्रमाणें अनेक टिकाणीं व जातींत पसरली आहे. त्यामुळें किती लाखो व कोटयावधि स्त्रिया वैधव्याचें असह्य दुःख कसकसें भोगीत असतील, याची कल्पनासुध्दां करितां येत नाहीं. कारण मनोनिग्रह करून मनुष्य वस्तींत राहून स्त्री-धर्मरक्षण होणेंच नाहीं. मनानें व नेत्रानें तरी त्या दोषाला पात्र होतातच. एक केश-वपन केलें व दुसरें कुंकूं पुसून सर्व सौभाग्य हिसकून घेतलें, म्हणून काय झालें ? त्यांचें अंतःकरण, बरे वाईटाचे विचार त्यांचे जवळच आहेत. सर्व बाह्य प्रकारांनी नागविलें पण अंतर कोण नागवील ? कारण स्त्रीधर्म म्हणजे काय ? निरंतर पतीची आज्ञा पाळणें, त्याचे मर्जीप्रमाणें वागणें. त्यानीं लाथा मारिल्या, शिव्या दिल्या, दुस-या रांडा ठेविल्या, नवरूजी दारू पिऊन, जुवा खेळून, कफलक हाऊन शंख करीत, चोरी करून, कोणाचा प्राण घेऊन, फितूर, चाहाडी, खजिना लुटून, लांच खाऊन जरी आले; तरी स्त्रियांनी आपले हे कोणी जसे कांही कृष्णमहाराज गौळयांचें दही दूध चोरून चंद्रावळीला कलंक लावून आलेत; असे समजून परमात्म्यासारखींच यांची मोठया हासतमुखानें देवासारखी पूजा करावी, सेवेंत हजर रहावें हा स्त्री-धर्म. पण जेथें बरे वाईटाचा विचार आहे तेथें स्त्रीधर्म कसा राहील; तेथें विकल्प तेव्हांच येईल कीं नाहीं ? तेवढें एक परद्वारच केल्यानें पातिव्रत्य नेम मोडतो असें नाहीं. पातिव्रत्य मोडण्याला लक्षावधी कारणें आहेत. देवासारखी नवऱ्याची पूजा करावी. आतां तशी पूजा कोणती करते ? सावित्री-आख्यानांत पतिव्रतेचे नेम सांगितले आहेत त्याप्रमाणें काटेतोल आज कोणती वागते ? अशी एक उगीच दाखल्याला दाखवा बरें ?

त्यांत सांगितले आहे कीं, पतीनें लाथ मारली तर हासून म्हणावें की, नका पतिराया मारूं हो, तुमचे पाय दुखतील. असें म्हणून महाराजाचे पाय लागलेच रगडीत बसावें. हातानें बुक्क्या, काठया मारल्या तरी रडूं नये. हासावेच नी लागलेंच ताजें लोणी घरीं नसलें तर शेजारणीचे घरून, नाहीं तर बाजारांतून विकत आणून स्वामींचे तळहात मारण्यानीं तळहावलें असतील म्हणून चोळावे. आतां असें कोण चोळिते ? तळहात चोळण्याऐवजी याचे हात चुलींत जावोंत अशी बरीक म्हणते. जो पदार्थ नवऱ्याला नको तो हिनेंही वर्ज करावा. इकडे उलट नवऱ्यांनीं टाकला कीं यांनी उचललाच; गोड मात्र पाहिजे हो. भाजी ती कोठे गाजराची, कडुभोपळयाची असली तर मग मात्र जन्मभर म्हणाल तर वर्ज होईल. नाही तर म्हणाल कीं, आंबा नवऱ्याला खायला नाहीं म्हणून बायको टाकील, होणार नाहीं. नवऱ्यांनी

पाणी म्हटलें कीं स्वच्छ तांब्या पेला धुवून पाणी हजर. आतां तसें नाहीं. नवऱ्यांनीं पाणी मागितलें म्हणजे बाईसाहेब म्हणायाच्या, आहो मला पण केव्हांची तहान लागली आहे, त्या तांब्यांत पाणी आहे तें तुम्ही प्या नी मलाही एक प्यालाभर द्या. हा बाळया मला उठून देत नाहीं. काय करूं.

नवऱ्यांनीं आंघोळीचें नांव घेतलें कीं, पाट मांडून घंगाळांत ऊन पाणी विसावून पाय घासण्याकरितां तयार उभें रहावें. आतां आंघोळीला पाणी मागितलें कीं, कोण आहेरे, राम्या, अरे यजमानाला आंघोळीस पाणी दे. धोत्रें चुणून ठेव नी मला विचारलें तर चहा घेतात म्हणून सांग. यजमान जेवावयास आल्याबरोबर पाट, तांब्या मांडून, ताट वाढून पतीचे आवडते पदार्थ वाढीत, गोष्टी सांगत भर्त्याचें मन रंजवीत भोजन होईसतो माशा मारीत बसावें. आतां तिकडून आटपलें कीं नाहीं, वाढा, नऊ वाजले असें म्हटलें कीं, हिकडून जबाब, हो आले आटपत, वाढतें, रोजचे मेले नऊ कपाळीं बसलेच. आहो, कांहीं डाळ भाजी शिजली तर पाहिजेना ? कां तसेच तांदूळ वाढूं पानावर ? नित्याचेंच आहे. एका दिवसाचें नाहीं कांहीं. आतां विडाबिडयाचें नांव घेतलें कीं, तें कोनाडयांत तबक आहे, घ्या एक विडा करून तेवढा. विडा करवत नाहीं का काय ? सारें जसें हातांतच पाहिजे. मग पतीराजांनीं जावें तबकाजवळ. त्यांत पहावें तों चुना नाहीं. कांहो, यांत चुना नाहीं; घ्यावो, तेवढा काढून. आहो, सुपारी, त्या वरच्या पेटींत पिसवी आहे, तुम्ही विडा खा नी मला एक करून ठेवा. जेवण झाल्याबरोबर तोंड कसंसंच होतं का ? हें खरें ना ? हा आतांचा पतिव्रतापणा. आता सगळे इत्थंभूत सांगु गेले तर हा एक वेगळाच निबंध होईल. तर असे अगदीं शास्त्राप्रमाणें कोण वागतें व वागवूनही कोण घेतो. जर बायकोला नवराच देव तर नवऱ्याची वागणूक देखील देवाप्रमाणेंच पाहिजे. बायकांनीं भक्ताप्रमाणें जशी भक्ती करावी तशी नवऱ्यानें देखील त्यांजवर देवाप्रमाणेंच ममता करून त्यांचें सुख दुःख जाणावें कीं नाहीं ? जसें देव भक्ती पाहून सदा प्रसन्न राहतात. भक्ताचे गुणदोष आढळले तर ते कसे तेव्हांच खरें खरें कारण सांगून त्यांचा अपराध त्यांचे पदरांत घालून ममतेनें शासन करतात, तसें यांनीं करूं नये. तर नवरा कसाही दुर्गुणी असला तरी त्याला देवाप्रमाणेंच मानून कोण वागेल बरें ? पांडवाचे चुलते धृतराष्ट्र आंधळे होते म्हणून गांधारीनें डोळ्याला पडदे, वर-योजना झाल्याबरोबर लग्न होण्यापूर्वीच बांधले; तरी डोळे असतां आंधळ्यासारखे डोळे मिटून चाल म्हंटलें तर कोण चालेल ? इतका मनो-निग्रह करण्याचे सामर्थ्य कोणाचे अंगीं असेल हें सांगवत नाहीं. तुमच्या उड्या शास्त्रावर, पण येथें शास्त्र, पुराण, पोथ्या करणारेसुध्दां दांतघशीं पडतात. कसें म्हणाल, तर शास्त्रकर्त्यांनी ज्या पूर्वयुगांत झालेल्या पतिव्रता निवडून काढल्या. त्यांतून एक दोघी तिघी तर दोषास पात्र असूनही त्यांची तिकडे पहिले वर्गातच योजना केली हें कसें बरें ? आतां द्रौपदी पांच नवऱ्यांची बायको असूनही कर्ण

महाराजांचे आंतर्यामीं चिंतन करीत होती कां नाहीं ? आहिल्या सूरेंद्रच्या आंकारूढ होऊन शिळा (होऊन) पडली, अष्टाधिकार झाले. सत्यवती, कुंती हयानीं आपले कुमारदशेंतच, एकीनें श्रीवेदव्यास, एकीनें कर्ण, असे दोन पुत्र प्रसवल्या तरी पटांतच नांव ! एकीनें पाराशर ऋषिपासून अंगाची दुर्गंधी घालविण्याकरितां ऋषिवचन मान्य केलें. एकीनें मंत्रप्रचीति पाहिली. वारे देव ! वारे ऋषि ! एकाचडी एक ! तेव्हां नाहीं का एक गंधर्व विवाह होऊन पुनः शांतनू व पंडुराजाबरोबर पाणीग्रहण केलें. मग तो नाहीं कां पुनर्विवाह झाला ? तेव्हां जीं पोरें झालीं तीं उदार कर्ण व वेदव्यास पूज्यमान होऊन देव त्यांचे पायां पडूं लागले. आतां तसें पोर झालें कीं, कोणी म्हणतो, लेकावळा. (बटकीचे पोटीं जन्मलेला) कोणी म्हणतो, खर्चा, कोणी म्हणतो विदूर, कोणी म्हणतो गोळक, कुमारीचे पोटीं झालेला त्याला काय म्हणावें हो ? हें सांगा. मोठे शास्त्र पुराण पारंगत झाले आणि त्यानीं भारतासारखे ग्रंथ म्हणून आईबापही त्यांतच पावन का ? कर्णानीं पांडवाबरोबर कुरूक्षेत्रीं लढाई केली त्यांतच आईला त्या दोषांतून मुक्त केली, असें वाटतें.

तारा ही वालीवानरांची बायको. त्यानीं आधींच धाकटा भाऊ सुग्रीवाची बायको रुमा हिला घरांत बंधु सुग्रीव काळतोंडें लांब शेपटीचें बांदरोबा, यास हाकून लाविलें. पुढें रामचंद्र महाराज भेटंले, तेव्हां समदुःखी ! एकाची बायको रावणानें नेली. एकाची भावाने नेली. काय मेळ संगम बरोबर झाला ! तेव्हां रामचंद्रजीनें सुग्रीवाची कीव करून वालीला कपटाने मारून ताराचें लग्न सुग्रीवाबरोबर लावूं लागले. तेव्हां ती बिचारी म्हणाली कीं, महाराज, हें कसें ? धाकटा दीर म्हटला म्हणजे मुलासारखा ; तेथें हें मला अनुचित दिसतें. तेव्हां रामचंद्रानीं सांगितले कीं, कांही चिंता नाहीं, तूं धाकटया दीराबरोबर पुनर्विवाह केलास तरी तुझे नांव पातिव्रतेमध्येंच गणलें जाईल. हें इतकें झालें. तेथें श्रीधरस्वामीनीं लेखणीचे दोन टांक आधीक मारिले कीं, देवांनीं केलें त्याला कांहीं हरकत नाहीं ; मानवानें तसें करूंगी नये. पण स्वामीला तेव्हां येवढें कसें नाहीं कळलें कीं, हा कित्ता पुढें सारे अगदीं वळणशुध्द वळवितील. काय करतील हो ! सुग्रीवाचे राज्यभिषेकाचे गर्दीत द्रव्याच्या मोटा बांधण्याचे धांदलींत विसरले. नाहीं तर आणखी एखादी ओवी जरा धास्ती बसण्याजोगी लिहिली असती.

आतां सिताबाई रावणानें नेली, तेव्हां बेटा चुकला. सिताबाईचे रूपाला भुलून पडला हायतोबा करीत नी काय ! त्यानें त्याच वेळेस, आतां चालू कायद्याप्रमाणें रामराजास लग्नाचा खर्च एक दोनचारशांचे ऐवजी दोन तीन लाख रुपये दिले असते म्हणजे सर्व मिटलें असतें. सुखाचा बिचारा नांदला असता; व बायकोच्या पायीं रावणाचें राज्य गेलें, असें आतां कोणी म्हणते ना. पण तो काय करील ? परस्त्रीवर बलात्कार करशील तर तुझे

शरिराचे शंभर तुकडे होतील, असा ब्रम्हदेवांनी त्याला शाप दिला होता म्हणून त्या शापानें गाय होऊन गेला होता. त्यामुळें त्यानें लढाईतच आपला शेवट करून घेतला, नाहीं तर एक लग्नाचा तर काय, दहा लग्नांचा खर्च त्यानें दिला असता; पण सिताबाईला पुनः अयोध्या काळी का गोरी दाखविली नसती. त्यानीं पाहिजे तितके प्रयत्न केले; त्यांत कांही कमी केलें नाहीं. त्याचा झाला प्रयत्न; पण इकडे एक पतिव्रतापणाचा मासला मिळाला. तो कसा ? मंडोदरीला रावणानें सांगितलें कीं, तुम्ही महान पतिव्रता आहांत, तेव्हां सिताबाईला बोध करून आपली बहिण (सवत) करा. तेव्हां पतिवचन शिरसावंद्य. तें पतीचें वचन मान्य करून आपल्या पतीचें मन-इच्छितहेंतू पूर्ण करण्याकरितां दुसऱ्याची बायको देखील फसवून आणावी, त्याला काय हरकत ? हें अगदीं निर्दोष पातिव्रत्य असें समजून मंडोदरी बाईसाहेब गेल्या तेथें. पुष्कळ सिताबाईला बोध करून सांगितलें कीं, पहा, रामरावण एक राशी आहेत. त्यांच्या नांवाला प्रथम 'रा' हें अक्षर आहे; तसेंच रावणाला आहे, आमचे राक्षसबावाचे पराक्रम, धनदौलत, राज्य पहा; तिकडे काय वनवास; रहायला घर नाहीं, राज्य नाहीं, सारा फजीता, इतकें सांगून बोध केला तरी सिताबाईला, रावणाची बळीचे घरीं कुणबीनीनें किती फजिती केली. अंगदाचे पाळण्यावर रावण उरफाटा टांगिला होता, तेव्हां अंगदाचें बाळमुत्र पिऊन ही स्वारी आली असून याचे बापाचें देखील आपले जवळ कांहीं चालावयाचें नाहीं हें पक्कें ठाऊक होतें, म्हणून तिनें मंडोदरीला चांगला खरपूस उपदेश करून परत लाविलें. तें झालें तिकडे, पण इकडे पतिवचन मान्य करून त्यांची मर्जी राखून आपल्या पातिव्रत्य नेमास दुसऱ्याची बायको थापाथुपा देऊन स्वामीचे हवाली केली, तर कांहीएक दोष नाहीं; उलटें मंडोदरीसारखें पुराणांत नांव गाजलें, तेव्हां असा हा एक दोहोअर्थी मासला. म्हणजे तिकडें नवऱ्याची मर्जी बायकोनें ही मोठी कामगिरी बजाविली म्हणून नवरा खूष. इकडे आपण आपला नेम राखला म्हणून बायको खूष. तिसरीच बिचारी फाशांत पडली. दोघांचे बापाचें काय गाठोडें गेलें बरें ? वाहवारे देव ! धन्य त्या पतिव्रता !

आतां यांत थोडीशी आपल्या देवाची निंदा करूं नये ती करणें भाग आलें. कारण खऱ्याला काय ? तें कसेंही असो, आपल्या शास्त्रांत सांगितलें आहे कीं, लढाई करते वेळेस बाप, भाऊ जर समरांगणांत समोर आपल्याशीं लढूं लागले तर बेलाशक मारावे, मागें पुढें पाहू नये. लक्ष्मणानीं इंद्रजित मारला तेव्हांच श्रीरामचंद्रजीनें सांगितलें की, बाबा लक्ष्मणा, काय करतोस; क्षत्रिय धर्म मोठा कठीण आहे. जावाई असो, का पोटचा मुलगा असो; कोणाची भीड धरणें नाहीं. ते वेळेस सुलोचनेचें खरें पातिव्रत्य पाहून इंद्रजिताला उठविणें हे रामाचे स्वाधीन होतें. पण मारुतिबोवाचें व बिभीषण घरभेदी याचें ऐकून सुलोचनेसारखें दुर्मिळ रत्न विस्तवांत घालून जाळून टाकलें. असो, तसें आतां खरें जें समारे आलें तें उघडें करून दाखविणें जरुरी पडलें म्हणून जराशी यांत दोनतीन देवांची निंदा केली, याची मी

त्यांचेजवळ प्रार्थना करून माफी मागेन. क्षमा केली नी न केली तरी ते देव आहेत. तेव्हांचे ऋषि तरी काय ? कोणी हरणीचे पोटीं झाले; तें कोण शृंगऋषि, कोणी पाखराचें पोटीं झाले; ते भारव्दाज, कोणी गाढविचें पोटीं झाले; ते गर्धभऋषि, गायीचें पोटीं झाले ते वृषभऋषि. तेव्हां त्यांनी आपलें पशूप्रमाणें लिहून ठेवलें, झालें. ते गेले करून पण निस्तरणें आलें स्त्रियांचें कपाळी. असो, पुढें येथें तुमचें काय चालणार आहे ?

अरे, जे तुम्ही सिंहासारिखे धैर्यवान, भगीरथासारिखे महा प्रयत्नी, जैमिनीसारिखे व्युत्पन्न, अरे, तुम्ही निधडे शौर्यशाली वीर बनून महान् महान् अजिंक्य शत्रूस जिंकून त्याला बकरें करून सोडलेत; अग्निसारिखे महा प्रखर दैवत त्यास मुठींत आणून त्यापासून यंत्रव्दारें नाना युक्ति-प्रयुक्तीनें पाहिजे तशीं कामें घेऊं लागलांत. वायु हा अग्नीपेक्षांही बलाढय, अग्नि डोळयानें दिसतो, एक वेळ हातांत देखील येतो, पण वायु हातीं धरितां येत नाहीं अगर दिसत देखील नाहीं असा हा अनिवार वायु त्यालाही तुम्हीं आपल्या शक्तिसामर्थ्यानें बसांत आणलें. वीज ही तर सर्वांची आई. निरंतर मेघमंडळांत आकाशांत, जेथें पक्ष्याचें देखील जाणें होणार नाहीं अशा उंच ठिकाणी राहणार. तिलाही खालीं ओढून बटकीप्रमाणें राबावयास लाविली. असे तुम्ही बलाढय पराक्रमी असतांना गरीब विधवा स्त्रियांना या लज्जेच्या दरींतून ओढून सर्व जातीला मोडून एकदम त्यांच्या कपाळी सौभाग्याचा मळवट भरून सौभाग्यशाली करण्यास तुमच्यानें पुढें होववत नाहीं काय ?

अरे, तुमचा मोठेपणा व शौर्य घरांतच. जशी एखादी अंधळी म्हातारी आई मध्यें बसते व तिच्या भोंवतीं पांच सहा लहान लहान मुलें. खेळतां खेंळतां एक म्हणतो, आई मी राजा झालों ग, दुसरा म्हणतो आई मी प्रधान, तिसरा म्हणतो मी सेनापति. आतां असें राज्य करूं ! ही सेना ! हे दरबार ! याप्रमाणें हे तुमचे सारे मृगजळाचे लोट आहेत. पण गहामर्दीचा विडा एकही उचलीत नाहीं. अरे, तुम्ही केवळ इसापनितीतींल उंदराच्या सभेंतील उंदराप्रमाणें आहांत. ''मांजराचे गळयांत घांट बांधावी'' हें खरें तोंडानें मात्र म्हणतां पण पुढें होतो कोण ? सभा भरवितांना सभा भरली, म्हणजे तेथें काय मोठी शालजोडी, लफेदार पागोटयाचा झोंक लावून डौलानें जाऊन पल्लाभर सुपारी, दहा गाडे विडयाचीं पानें, हार तुरे, एक हौदभरं गुलाबी अत्तराचा सत्यानाश करुन घरीं यावयाचे एवढेंच काय तें; दुसरे कांही नाहीं. या अशा तुमच्या पोकळ सभा तर आज तीस पसतीस वर्षांपासून चालल्या आहेत. उपयोग काय ? तुम्ही तुम्हाला आपल्या ठिकाणीं धन्य मानून घ्या. पण पाहूं गेलें असतां अजागल-स्तनाप्रमाणें निर्जीव आहांत.

अरे, पहा जगनियंत्या परमेश्वरानें आपल्या अगाध चातुर्यानें ही सृष्टि नाना प्रकारच्या मनमोहक पदार्थानें भरली तरी त्यांत धन व स्त्री हें दोन तर अतिशय मन

ओढून घेणारे पदार्थ आहेत. त्यांतून स्त्री तर पैशापेक्षांही अति वेधक असून तुमच्या जिवाला लक्ष्मीपेक्षां लक्षपट सुख देणारी आहे. पहा, तुम्हांला एखाद्या अति उत्तम बागबगीच्यांनीं नाना प्रकारच्या मौल्यवान चित्र विचित्र पदार्थांनी गाडया, घोडे, रथ, पालख्या, हत्ती, उंट, सैन्य, सेवकसमुदाय कीं जेथें तुमच्या तोडांतून शब्द बाहेर पडण्याचा मात्र उशीर अशी सर्व संमृध्दि असलेल्या राजवाडयांत राजकीय थाटांत स्त्रीविरहित ठेवु द्या बरें ? तुम्हाला तो राजवाडा केवळ स्मशान; ती उंच सुवर्ण-मंचकीं गरम गदेल्याची सेंज केवळ चिता; तो सर्व सेनासमुदाय, मित्र, स्नेही, सेवकजन, शत्रू ; पंचपक्कान, तें कडू लिंबाचे गोळे ; उंच वस्त्रें, नानापरीचे रत्नखचित अलंकार सर्पासारिखे भासून तुम्ही अगदीं वेडे होऊन जाल. फार तर काय, त्यावेळेंस देव जरी तुमचेपुढें प्रत्यक्ष येऊन उभा राहील तर तुम्ही त्याला देखील त्या सपाट्यात हाकुन लावाल यांत संशय नको. तेव्हा या सर्व गोष्टींवरुन तुम्ही आपल्याशीं तुलना करून पहा कीं, पुरुषाविरहित स्त्रियांस तरी कसें सुख होईल बरें ? जी तुमची दशा तीच तिची. तिलाही किती मोठया ऐषआरामींत सर्व पृथ्वीचें सार्वभौमत्व देऊन एकटी ठेवा, म्हणजे पहा तिची कशी दशा होते ती. ईश्वरानें हा जोडा स्वेच्छेनेंच नेमिला आहे. पहा, पक्ष्यांपासून तो निर्जीव झाडाझुडपांतदेखील त्यानें स्त्रीजाति निर्माण केली आहेंच. प्रत्येक गोष्टीला, जिनसेला, दुसरा त्याच जोडीचा मुकाबला असतो. त्यावांचून शोभा येतच नाहीं. जोडीवांचून कोणतेंच काम नाहीं. तेव्हां या जगदारण्यांतून तुम्ही एकटे फिरूं शकाल ? हा संसार तुम्ही स्वतः चालवाल काय ? प्रपंचाचे शेत तुम्ही एकटे नांगरून काढाल काय ? स्त्रीविरहित तिचें मुखावलोकन न करितां तुम्ही अगदीं संन्यासवृत्तीनें एक दोन महिनें तरी राहूं शकाल काय ? अरे पहा, स्त्री जर तुम्हांस सोबत नसली, तर तुम्हाला जोडयाजवळ देखील उभे करण्यास तेच तुमचे काका, बाप मागें करितात. सडयाफटिंगाला पुसतो कोण ? ज्याला स्त्री मुलेंबाळें आहेत तो कसाही त्याच्या सदगुणानें अगर दुर्गुणानें संकटांत पडला किंवा त्यावर कोणाची खपगी झाली, अथवा सावकाराचें देणें असलें तर ''त्याच्या मुलाकडे पहा हो,'' असें म्हणतात, तर यावरून काय झालें ? त्याची दया करतो कोण ? फक्त मुलाबाळाकरितां त्याची सोडवणूक होती. प्रत्यक्ष रामचंद्रजीचें देखील सीताविरहित, अगस्तीनें दर्शन घेतलें नाही, कारण प्रत्यक्ष शक्तिच जेव्हा रावणानें नेली तेव्हां ते रामराजे हाय हाय करीत, ''अगं वल्लभे, हे जनकतनये, गुणसरिते, सीते सीते '' करीत दीनवाणें भिकारी होऊन सर्व अरण्यांत रडत फिरूं लागले. अशी या स्त्रियांच्या विजयीपणाची शक्ति आहे. अरे, तुम्ही एखाद्या बलाढय शत्रूवर मोठया लष्करानिशीं दारूगोळे व नाना प्रकारचे प्राणघातक शस्त्रांनी मारा करून त्याला आपला बंदा गुलाम कराल, दोहोंकडचे अगणित बळी पडतील, रक्ताचे पूर वाहतील, तेव्हां एखादे ठिकाणीं तुम्हांस जय धार्जिणा होईल. वाघाला धरून सांपळयांत कोंडाल, सिंहासारख्या क्रूर प्राण्यावर देखील तुम्ही घोडयाप्रमाणें जीन बांधून तोंडांत लगाम देऊन त्यावर स्वार व्हाल, पण ही यःकश्चित् अबला हिच्या एका नेत्रकटाक्षानेंच तुमचें सर्व

शौर्य, तेज, वीरश्री गळून जाऊन लागलेंच तिचेपुढें कुत्र्यासारिखें पाय चाटावयात धांवतां ! अरे, तरवारीने शस्त्रांनी कोणीही कोणाला घायाळ करीलच करील, यांत काहीं मोठा पुरुषार्थ नाहीं. पण जें कोणी नुसत्या दृष्टींनीं दुरून पाहिल्याबरोबर हाय हाय करण्यात लावील तें खरें. तेव्हां आतां जास्त पराक्रमीं कोण ? ती स्त्री किंवा तुम्ही ? अरे, जी तुम्हावर प्राणापेक्षा अधिक प्रीति करिते, तुमची आई देखील तुम्हांस लहानपणीं जपली नसेल तितकी ही आतां ऐन बाणीच्या वेळेस तुमच्या जिवास जपते ; तुमच्या आज्ञेंत केवळ बिजलीप्रमाणें लवते ; या संसारांत नाना तऱ्हांनीं तुमच्या अब्रूस कोणत्याही प्रकारें धक्का न बसावा म्हणून जपते ; जेव्हां पहावी तेव्हां सेवेंस हजर ; दुःखासुखाचे वेळीं अमृताचे वल्लीप्रमाणें सदां सर्वदां सर्व सोसून निरंतर गोडच ; सारांश तुम्हाला जिकडून सुख होईल तें करण्यास सर्वदा तयार अशी जी ही, तिला तुम्ही नानाप्रकारे दोष देऊन या पृथ्वीतलाचे तळीं घालूं पहाता, याची तुम्हांस काहींच लाज वाटत नाहीं कारे ? अरे, मुर्खानो, स्त्रिया जातिनिशीं लाजाळू, नाजूक व उपजत मूर्ख ! तुम्ही काय महाराज मोठे उपजत शौर्यवान, धैर्यवान, पैलवान, व्युत्पन्न, तेव्हां मातेच्या सुवर्ण कुचकमंडलूंतले अमृतास ओंठ देखील लाविला नाहीच, तें तुम्ही सर्व या अबलांस दिलें ! कारणं आपण सबल पडलांत तेव्हां हें असें करणें आपणांस कसें बरें साजेल ? म्हणून ही स्त्रीजाति अगदीं निर्बल, मुर्ख, साहसी, अविचारी ; अशीं नानाप्रकारचीं निंद्य विशेषणें देऊन एकदांच त्यांच्या नांवाचा डंका ठोकलांत. त्यांना निरंतर बदीवानासारिखे गृहतुरूंगांत कैदी करून ठेविलेत, व जिथें तिथें आपली चढती कमान करून राव बनलेत. त्यामुळें तुम्हांला वाटते कीं, बायको म्हणजे काय ? अरे, ‘ज्याचे हातीं ससा तो पारधी’ बाकी सारे गैदी समजलात. लहानपणापासून आपलें हातीं सारी सिक्का आधीन ठेवून स्त्रीजातीला अगदीं अंधारकोठडीतं या जगापासून दूर पडद्यांत जरबेंत निरंतर बटकीसारखी ताबेदारींत ठेवून जेथें तेथें तुम्ही आपलेच गुणांचे दिवे पाजळलते. त्यांना न विद्या, न कोठें जाणें न येणें. गेल्या तरी तेथें त्यांच्यासारिख्याच सर्व अज्ञान. एकीसारखी दूसरी. मग जास्त ज्ञान व शहाणपण त्यांना कोठून येणार ?

अरे, नवऱ्याअधीं बायकोनें मरावें किंवा नवऱ्यानें बायकोअधी मरावे याचा तुमच्या बापदादांनीं देवांपासून कांहीं दाखला आणला काय रें ? मरणें किंवा जगणें हें तर त्या सर्व शक्तिमान नारायणाचे हातीं. तुमचे हातीं काय दगड आहे ? तरुणांनीं मरावें अगर म्हाताऱ्यांनी जगावें, याचा कांहीं नेम आहे काय ? कित्येक उपजतांच, कित्येक ऐन तारुण्याचे भरांत, शंभर वर्षें या जगाचा पुरा अनुभव घऊन, कित्येक ऐन सुखाच्या वेळेस, कित्येक राज्याच्या गादीस लाथ मारून यमाचे खडे दूत पहातांक्षणीं हें सर्व सार्वभौम राज्य म्हणा किंवा मोळीचें ओझें म्हणा, टाकून एक क्षणाचा विलंब न करितां सर्व आपापलीं मुलेबाळें बायका सोडून, कोणी खुषीनें अगर गैर खुषीनें, जातातच कीं नाहीं ? तेथें कोणाचा

इलाज चालतो काय ? मोठा राजा जरीं असला तरी यमदुतापुढें त्याचें कांहीच चालत नाहीं ; मग तेथें या गरीब स्त्रियांचें कोण ऐकता ? तेव्हां हा ईश्वराघरचा मळा. त्याला या स्त्रियांनीं काय करावें ? बरें असो. मागें कधींकाळीं कोणी तरी एखादी स्त्री आपलें नष्ट झालेलें अगर यमानें नेलेलें सौभाग्य परत मागण्यास ब्रम्हदेवाजवळ गेली होती, तेव्हां तिला सृष्टिनिर्मित्या भगवंतानीं ''कोणत्याही स्त्रियेस पुन्हा सौभाग्य तिचे हयातींत मिळणार नाहीं '' असा कांहीं दाखला तरी दिलेला तुमच्या भारतांत सांपडतो काय ? एक सावित्री वेगळी करून तर यमामागे सौभाग्य-दानाकरितां कोणीच गेली नाहीं. बरें, ती गेली तशी आपल्या पतीस परत घऊन आणखी त्याजवळून तिनें पुष्कळ दुसरें वरदान मागून आणलें. या स्त्रीजातींत सावित्री तरी आपले पतींचा प्राण परत आणण्याकरितां यमदरबारांत जाऊन आली. पण पुरूषांमध्यें कोणी तरी आपले बायकोचे प्राणाकरितां यमराजाचें दरबारांत तर नाहींच ; पण उगीच त्या दरबाराचे वाटेवर तरी गेलेला कोठें ऐकण्यात आला आहे काय ? तर जसें एकदां सौभाग्य गेलें म्हणजे स्त्रियांनीं आपलीं तोंडें अगदी एखाद्या महान खुन्यापेक्षांही महाजबर अपराध्याप्रमाणें काळीं करून सर्व आयुष्यभर आंधारकोठडींत राहावें, त्याप्रमाणें तुमच्या बायका मेल्या म्हणजे तुम्हीही आपलें तोंड काळें करून दाढया मिशा भादरून यावतू जन्मपर्यंत कोठेंही अरण्यवासांत कां राहूं नये बरें ? एक बायको मेली कीं तिचे दहावे दिवशींच तुम्ही दुसरी करून आणावी, असा तुम्हाला कोणत्या शहाण्या देवानें दाखला दिला आहे, तो दाखवा बरें ! जशी स्त्री तसेच पुरुष. तुमच्यामध्यें मोठे अलौकिक गुण कोणते ? तुम्हीच कोण असे शूर म्हणून देवांनीं तुम्हाला इतकी मोकळीक दिली ?

अरे, तुमचा शूरपणा जोंवर आजमावून पाहिला नाहीं तोंच तुमचा आब. झांशीच्या राणीसारख्या फार नकोत पण एक चारशेंपाचशें स्त्रियांना निसंग होऊन हातांत संगिनी घेऊ द्या. मग पहा तुमची कशी दुर्दशा उडेल ती. अरे, मग चुलीजवळ सुध्दां लपण्यास जागा मिळणें कठीण. पूर्वी मराठी राज्यांत तरी असे तरवारबहादर होते कीं, ज्यांनीं दिल्लीचें पुरातन तक्त हालविलें-पण सांप्रत इंग्रजबहादराचें राज्य झाल्यापासून तुमची सद्दी फिरली. रति हाटली. तुम्ही आपल्याला 'मला कोण वाणी माझा मीच वाणी' या म्हणीप्रमाणें कलमबहादर असें म्हणवून घ्या. विचारितो कोण ? पण कलमबहादरापेक्षां आतां सांप्रतच्या स्थितींत 'भाकरीबहादर' हें नांव तुम्हाला खास साजतें.

बरें असो, तुम्ही मोठे कलमबहादर, ज्ञानी, धर्मशील, परोपकारी, कनवाळू असे सर्व गुणसंपन्न बत्तीसलक्षणी पुतळे आहांत तर तुमच्या अंगीं भूतदया कां नसावी बरें ? का भूतदयेचें तुम्हांस काहीं वांवडें आहे ! अगर ती तुम्ही वाघाला तर उसणी दिली नाहीं ना !

अरे, तुम्ही म्हणतां ना कीं, आपल्या जिवावरून दुसऱ्याचा जीव जाणावा. मग येथें तुमचा जीव कोठें जातो ? तुमचा जीव जसा तुम्हांला प्यारा आहे तसा स्त्रियांचा त्यांना नसेल काय ? स्त्रिया दुसऱ्या मातीच्या, दगडाच्या, नाहींत तर लोखंडाच्या बुकणीच्या केल्या असतील ? तुम्ही व तुमचा जीव हें अगदीं गाळीव सोनें स्त्रिया काय अगदीं यःकश्चित् प्राणी, ढेंकूण नाहीं तर पिसूं असें तुम्हाला वाटतें ? व हें तुमचे अनुभवाप्रमाणें अगदी बरोबर आहे. कसें जर म्हणाल तर पतिराज एकदां स्वर्गवासी झाले म्हणजे या बाईसाहेबांचे हाल कुत्रे खात नाहींत, त्यांच्या कपाळी मग काय ? माथ्यावरील एकदां सर्व केस कुरळे केसांवर नापिकाचा हात फिरला म्हणजे तुमचे डोळे थंड झाले. सर्व अलंकार गेले. सुंदरपण गेलें. सारांश तिला सर्व तऱ्हेनें उघडी करून देशोधडी केल्याप्रमाणें नागवून सांदीचे खापर करावयाचे. तिला कोठें लग्न कार्यात, समारभांत, जेथें कांही सौभाग्यकारक असेल तेथें जाण्याची बंदी. ती बंदी कां ? तर तिचा नवरा मेला, ती अभागी, करंटया कपाळाची. तिचें तोंड पाहूं नये. अपशकून होतो. मग हीं विशेषणें तिला. अरे, पण तिचा पति मेला, नाहीं कोण म्हणतो ? पण तो तिनें का मारिला ? देवांजवळ 'या नवऱ्याला देवा तुम्ही लवकर न्याहो' असा कांहीं तिनें अर्ज का केला होता ? कदाचित् 'या स्वारीला देवा तूं लवकर ने, मला याच्या काचांतून सोडीव' असेंही एक वेळ करुणा भाकील ; पण हे राजश्री यमनगरींत गेल्यावर यांचे पाठीमागें आपली कशी दुर्दशा होईल या धास्तीने तरी ती अशी प्रार्थना करणार नाहीं. पण न जाणो. छे याचा विचार कोण करितो ! ''नाऱ्यानें केलें पण केशाला प्रायःश्चित'' यासारिखें. त्याची आयुष्यमर्यादा संपली, बाजार झाला. तो आपलें बरेंवाईटाचें घेणेंदेणें करून चालता झाला. त्याचा दोष त्याचे बायकोकडे कशाकरितां ? बरें, तेंही असो, कबूल. जसें नवऱ्यामागें अगदीं सर्व सृष्टिव्यापार सोडून 'हरी हरी, देव देव' करीत बसावें तसें पुरुषानें कां बसूं नये बरें ? त्यानेंच कां दुसऱ्यानें लग्न करून नांदावें ? स्त्रियांवर त्या शास्त्रकर्त्याची करडी नजर कां ? स्त्रियांनीं त्या शास्त्रकर्त्याचे घरास कधीं काळीं आग लाविली होती वाटतें ; म्हणून त्यानें एकदम एकीकरितां साऱ्यांना एकच कायदा लागूं केला ? तसाच पूरुषांलाही असा एकच कायदा एकदम लागूं केला असता तर बरें होतें. पण असें कसें होईल ? या कामांत शास्त्रकर्त्यांनीं तरी आपले अकलेचा फांटा लांब झोंकून बराच खर्ची घातला, पुरुषानें एक प्रथम विवाहित बायको मेल्यावर पुनःलग्न करूं नये ; करील तो मातृगमनी, त्याला जातिभ्रष्ट करावें' असें केलें असतें नी कदाचित् उद्यां शास्त्रीबोवांच्या बायका एकदम जात्या तर त्यांनाही मग लोक असेंच 'करंटया कपाळाचे, याचें तोंड पाहूं नका,' यांना लग्नकार्यांत येऊं न देतां गांवाबाहेर मठांत डुसकून लाविते. म्हणून उघडच दिसलें कीं त्यांनींही आपली पीडा टाळण्याकरितांच पुरुष जातीला एकीपासून पांचशें बायका करण्याची परवानगी दिली. तेव्हां यांचें दैव फळफळलें. यांची एक बायको मेली अगर ती बिचारी दुखणाईत आहे तोंच दुसरीची तयारी. श्रीमंत असले तर मग काय 'आधींच उल्हास

त्यांत फाल्गुनमास.' एक तर पैशाचें व दुसरें माणसाचें बळ अनुकूल. प्रतिकूल कांहींच नाहीं. बुवा ऐशीं वर्षाचे केवळ पाप्याचें पितर असले तरी जवळ जे भोजनभाऊ तोंडचोपडे असतील त्यांनी म्हणावें, 'छे महाराज, आपण का म्हातारे झालांत ? कोण म्हणतो त्याचे दांत टाकीन पाडून' 'अहो, पण केसांनीं घात केला ना' ? अहो सरकार, उद्यां जरासा कलप द्या कीं झालें. त्यांत काय आहे, बरें असो. केसांचें होईल हो, पण या दांताळवाडीचा पत्तासुध्दां राहिला नाहीं. याला कांहीं युक्ति काढा. 'बरें महाराज, उद्यां अशी नामी एक त्या दंतवैद्याजवळून बत्तिशीच विकत आणतों. आपण तेवढी आपल्या मुखांत सिलक राहिलेली दाढ आहे, तेवढी मुखमार्जन करते वेळी उपटून टाका म्हणजे झाले; त्यात काय आहे. अहो आतांचे पंचविशींतलें पोर का आपली बराबरी करील ? छे हो महाराज, हें जुनें हाड. नासके मिरे जोंधळयाला हार जातील काय ?' असें म्हटलें म्हणजे झालें. महाराज फुगले, लागले चाळे करायला. डोक्याचे टक्कलाभोंवती शिल्लक राहिलेले दहा बारा केश, भोंवया, मिशा अगदीं पिंजलेल्या कापसासारिख्या जरी पांढऱ्याशुभ्र झाल्या असतील तरी त्याला तीन रुपयांची कलपाची पेटी आणवून दिवसांतून तिनदां कलप. लपावर लप चढवायचे, पट्टीदार मोठें आखडून धोतर नेसायचें, पागोटें लफेदार, अंगांत तटतटींत आंगरखा हाडकावर बळेंच घालावयाचा. खांद्यावर उपरणें, बोंचऱ्या तोंडांत उसणे दांताचें बखल बसवून, खलबत्त्यांत विडा कुटून ती हाडाची बत्तिशी लालभडक करायची. पायांत लाल जोडा, चालतांना कापरे येत असेंल तर हातांत विलायती काठी घ्यावयाची व दिवसांतून दहा वेळां पौष्टीक बदानी वडया, कोठे जिलीब्या, कोहाळे पाक हे खाऊन शंभरदां आरशात तो गालाचे खळगे पडून विद्रूप झालेला मुखवटा न्याहाळून इतका नखरा करून ज्याला त्याला विचारायाचें, ''काय रे, मी आतां कांहीं बरा दिसतो का?'' मग तेथें एखादा थट्टेखोर मतलबी असायचाच. त्यानें म्हणावें, 'छे महाराज, आतां तर बुवा तुम्ही कीं नाहीं, आपल्या गणपतच्या बरोबरीचे दिसतां, लग्न करा. घरांत कोठें आमचा जीव लागत नाहीं, मग तुमचा कसा लागेल ? आहो, म्हण आहे, हगवणी बायको, नागवणी सोयरा.'

मग काय महाराजचे नजरेंत रात्रंदिवस बायकोच. दुसरें कांहीं नाहीं. झालें, असें करून एखाद्या कसाबाला गांठून त्याचे जवळून जशी एखादी बकरी वाघापुढें टाकाण्यास विकत घ्यावी, त्याप्रमाणे हजार दोन हजार देऊन सुरेख मृगनेत्रीचें लग्न या मढयाबरोबरच करून द्यावें. पुढें हें मढें घराचे बाहेर एके दिवशीं शेवटीं गंगातिरीं गेलें म्हणजें झालें. सरला यांचा संसार. पुनःहीच आपली अवदशा. कां हे सर्व खरें ना ?

असें सोंग-नखरे स्त्रिया करितात का ? एकदां त्यांच्यावर ही आकाशाची कुऱ्हाड कोसळली कीं त्या तें वैधव्याचें गाठोडें पदरांत बांधून आपल्या भर्त्याचे गुण-अवगुण

वाणीत व सर्व घरच्या दारच्यांचा जाच काढीत मरून जातात. नवरा जरा अजारी झाला कीं तिचे तोंडचे पाणी पळतें. व ती त्याला हरघडी प्राणापेक्षांही जास्त जपते. मग ती भक्तिभावानें म्हणा अगर भीतिभावानें म्हणा, जसा तो असेल त्याप्रमाणें तीही त्याजबरोबर वागत असेल. कारण आपण कोणीही बरोबर ममतेने, निष्कपटानें वागत असलों, म्हणजे तो म्हणा अगर ती म्हणा, कशीही बाजिंदी असली तरी तिला त्याबरोबर चांगले वागणें भागच पडतें. नाहीं तर तुम्ही तिला रोज पाहिजे तशी, वाटेल त्याप्रमाणें वागवून पुनःतिनें नेकीनेंच रहावें, असें म्हणाल तर कसें होईल ? मग बरी किंवा वाईट वागणूक सहजीं स्वाभावीकच उत्पन्न होते. तुमच्यावरून तुम्ही पहा. तुम्हांला एक लुच्चा भेटला म्हणजे तुम्ही त्यापेक्षां दसपट लुच्चे बनतां किंवा नाहीं ! तसेंच हें. इंग्रजींत एक म्हण आहे कीं, ममतेपासून ममता उत्पन्न होते. तर जशी ममतेच्या पोटीं ममता उपजते तसेंच सर्व गोष्टींत आधीं आपले मनास विचारून मग दुसऱ्याचा विचार करावा. पण पुरुषाचेजवळ तेंही नाहीं. एखाद्याची बायको वर्ष दोन वर्ष आजारी पडली, तर हे राजश्री ‘ही कधीं मरेल हो’ ‘औषध देऊन कंटाळलों’ असें म्हणायाचे. पण बायको कशीही असो. ती जनलज्जेकरितां तरी असें म्हणणार नाहीं. पण इथें काय ? मुसलामानासारिखे सदा पूज्यच ; श्रीमंत असले म्हणजे अमीर, भिकारी हुये तों फकीर, बरें आतां मेल्यावर तर म्हणे पीर ! तसें हें लग्न झालें नाहीं तर ब्रम्हचारी ;; लग्न केलें तर घरबारी गृहस्थ ; बरें आतां शेवटी सर्व विधि झाले म्हणजे मग संन्यासी का झाले; पण संन्यास घ्यायाचा कधी ? तर संध्याकाळी. प्राणोत्क्रम होईल असें वैद्यांनी निदान ठरविलें म्हणजे सकाळीं, तेही दोन प्रहरी संन्यासदीक्षा घ्यावयाची. तोंपर्यंत तुमची या संसाराची आशा सुटत नाहीं.

अरे, तुम्ही असे अट्टल हुशार कोल्हे. तरी इंग्रजसरकारचे, ईश्वर असें सदोदित चिरकाल राज्य कायम ठेवो. हा राजा (शककर्ता) झाल्यापासून स्त्रियांना विद्यादान देऊन त्यांचीं मने नेहमी सर्व मानसिक व व्यवहारिक प्रसंगांत धैर्यानें राहण्यास पुष्कळ तऱ्हेनें बळकट झालीं आहेत. त्यामुळें त्यांचे हृदयांत जें अज्ञान वसत होतें तें जाऊन त्यांना आतां आपलें बरेंबाईट, कोणाशीं कसें वागावें ; हा संसाराचा गाडा कसा हांकाबा, सत्यता, स्वधर्म, पातिव्रत्य या विषयी त्यांना चांगले समजूं लागलें व यामुळें आपले या भरतखंडाची कांहीं दिवसांनीं स्थिति अगदी बदलून जाईल. तरी जे कोणी ‘पुणेंवैभवा’ सारिखे स्त्रियांचे हाडवैरी आहेत त्यांस हे अगदीं आवडत नाहीं, असें त्यांचे एक दोन पत्रांतील मजकुरावरून वाटते. कारण आज सरासरी चार पांच महिने झाले असतील. कोणी विजयालक्ष्मी नांवाच्या विधवा बाईनें गर्भपात केला किंवा मूल उपजल्याबरोबर त्याला तिनें स्वर्ग दाखविला. ह्याची चौकशी वगैरे चालू होतीच. तेव्हां कोणी या दीन विधवांचा कैवार घऊन यांचा पुनर्विवाह करावा असें पत्र लिहून सरकारासही विनंती केली. त्यावरून ‘वैभव’रावास फार राग आला, व

इंग्रज सरकारांनीं आमचे धर्मसंबंधी कामांत अगदीं हात घालूं नयें म्हणून बरीच ओरड केली.'वैभव'राव म्हणजे कोणी दुसरे आहेत असें नाहीं. ते तरी पुरुषच ; पण भेद इतकाच कीं पुरते सुधारले नाहींत. पण अडून अडून सुधारले आहेत. तर आतां युरोपियन लोकांत व आपले लोंकात धर्मसंबंधी भेद तो कोणता राहिला आहे ? एक भेद मात्र दिसतो, कोणता म्हणाल तर अजून त्या जातींतील स्त्रियेबरोबर कोणी लग्नासारखा शरीरसंबंध केला नाहीं. हेंच काय तें तेवढें उरले आहे. मग युरोपियन लोकांच्या तुम्ही कोणत्या चाली घेतल्या नाहींत बरें ?

त्यांच्यासारिखे पोषाख करूं लागलेत. त्यांच्यासारिखे किंवा त्यांच्यापेक्षां जास्ती विव्दान झालांत. त्यांचें जें भोजन म्हणजे मांसाहार व मद्य यांचा तर यथेच्छ उपभोग घेत आहांत, व त्यांचेसारिखें नित्य करण्यास झटत असतांही त्यांनीं धर्मांत हात घालूं नये म्हणून म्हणतां ? आतां धर्म तो कोणता राहिला आहे ? पाहिजे त्या ठिकाणीं आगीच्या गाडींतून, जहाजांतून त्यांच्यासारिखें म्हणजे अंगांत कोट, डोकींत टोपी, पायांत विजार स्टाकिंग बुट, हातांत लेवेंडर शिंपलेला छोटासा रूमाल, तोंडांत चुट्टा धरून अगदीं थेट साहेब बनून (फेर इतकाच की, ते गोरे नी तुम्हीं अबलक घोडयासारिखे धड ना काळे, ना धड पांढरे) पाहिजे तें अभक्ष्य भक्षून जीं नाहीं तीं अनन्वित कर्मे करून पुनः आम्ही स्वधर्मरक्षक आहोंत असें म्हणण्यास तुम्हांस कांहीच लाज वाटत नाहीं कायरे ?

अरे, ज्या देशांत आपले ज्ञातीचें एकही मनुष्य आढळत नाही, त्या देशांत आगबोटींत बसून जातां. तेथें त्या लोकांबरोबर मिसळून वर्षेचे वर्ष त्यांच्या समागमांत घालून पुनः इकडे परत आल्यावर पंचगव्य प्राचश्चित घेऊन डौलानें पंक्तींत बसायला तयार.

कारे, झालें का ? पंचगव्य प्रायश्चित दिल्यानें व एक नाहीं शंभर आंघोळी करून अंगास गांमुत्र लावल्यानें तुमचें अभक्ष्य साठविलेलें आंतडेसुध्दां धुवून निघालें का ? आतां येथें कोठें धर्म रडतो ? तेव्हां या धर्मात सरकारनें हात घालून तुम्ही जो त्यांचे लक्षावधि बाटली मधामृताचा खर्च करितां व तुमच्या भक्ष्यस्थानीं आज हजारों हजार गरीब बिचारे आजापुत्रांची, कोंबडे वगैरे अनेक पशुपक्ष्यांची आहुति पडते तें सरकार जर बंद करील तर किती चांगलें होऊन धर्माचें रक्षण होईल बरें ? ''पारखा पाय व घराला अपाय'' हें म्हणणें अगदी रास्त आहे. व तें कबूलही केलें असतें, पण केव्हां कीं जर तुम्ही या लोकांची कोणतीच चाल न घेतां स्वधर्मासच अनुसरून वागतां तर मग या दुर्दैवी विधवांना कधींच सुदैव प्राप्त होणेंच नाहीं, असें समजून त्या उगीच बसल्या. पण आतां काय सगळाच मनु बदलून गेला आहे. राहिलें आहे कोणतें ? ते लोक तुमच्यापेक्षां लाख हिश्शानें बरें. ते असे हिडगे चाळे करून आपल्या लोकांची एक तरी चाल घेतात का ? उलटे तुमचें हें सोंग पाहून

हसतात. अरे, गाढवांनो, तुम्हाला एखाद्या दूर देशांतील मनुष्य अगर आपले पूर्वीचे गत झालेल्या पूर्वजांपैकी कोणीही जर पुनः येऊन पाहील तर ही सृष्टि त्याला ओळखूंसुध्दां येणार नाहीं. कारण आज पांचपन्नास वर्षात नानाप्रकारचे कौशल्यकला होऊन साराच बदल झाला आहे. त्यांतून तुम्ही त्यांचे कुळांत कुलांगार उपजल्यानें तर फारच फेर झाला. कसा म्हणाल, तर जेथें नेहमी पोथी-पुराण ऐकूं यावयाचें, तेथें एस्. फेस्. ज्या घरांत साधारण आपल्या दर्ज्याला साजेल तसें सामानसुमान म्हणजे गालिचे, लोड, तक्ये, पाटपिढे, भांडी आपलीं तींच ताटवाटया, समया, मशाली, तर त्या ऐवजी, खुर्च्या, कोच, टेबल, भांडयाऐवजीं कपसासर, सुऱ्या, काटे, चमचे, किरोसीन दिवे, कुठें मून, कुठें रीडिंग ल्यांप. हे झाले. वाडयाऐवजीं, ते चौक, वोसऱ्या जाऊन एकदम बंगल्याची तऱ्हा. बरें चला ; यावरून कांहीं जुन्यापान्या सामानावरून कदाचित् त्यांनीं हे आपले नातु किंवा पणतु म्हणून ओळखिले असते. पण पोषाखावरून तुम्ही तर कधींच ओळखले जाणार नाहींत. कसें म्हणाल, तर पागोटयाकडे पहावें तर कोणते तरी जातिनियमाप्रमाणें बांधलेले अगर टोपी, नाहीं तर दहा हात तें काळें, पांढरे रुमालाचें फडकें. पूर्वी या दहावीस वर्षामागें, सुतकळयावांचून, अगर तेलंगी लोक वेगळे करून डोकीस हें असें फडकें कोणी तरी गुडांळीत होतें का ? पूर्वी डोकीला हें असें फडकें पाहिलें कीं, हा कोणी तरी तेलंगा असावा, अगर कोठून तरी हुंडी (सुतक) आली असावी, असें म्हणत असत. पण आतां तर जेथें पहावें तेथें ही फडक्यांची पलटण. असो, अंगांत हाफजाकिट, कोट, घडयाळाचे साखळीचा झोंक पहावा तर असेल कोणी. खालीं पहावें तों विजार पायांत स्टाकिंग बुट, मग वाटतें हा कोणीं मुसलमान, का पाशीं, का एखाद्या साहेबाचा बबर्ची आहे, काहो, हा आहे तरी कोण ? असें त्याला विचारानें विचारणें भाग होईल किंवा नाहीं ? बरें पोषाखाचें असो जावो. तुम्ही नेहमी त्याच्या दरबारीं वागतां तेव्हां पोषाख करा तसा पण या पोषाखात बाळांचे चेहरे काय खुलतात? गोरा असेल त्याला काही बरे दिसते. पण जे का कोळशाचे भाऊ असतात, ते तर काय विचित्र सोंगच दिसतें. इकडे पोषाखाचीही मजा. दुसरी गम्मत ही कीं, साहेबाला एक बाटली दोन दिवस पुरेल. पण यांना दर मिनिटास एक बाटली व एक पारख़्याची जोडी लागून पुनः आम्ही स्वधर्मनिष्ट म्हणून आमच्यांत परका पाय नको असें म्हणतात, याला का म्हणावें ?

अरें, ज्यांनीं तुमच्या देशास देशाची व मनुष्यास मनुष्याची कळा आणून मनुष्य करून दाखविलें. पूर्वी तुम्ही माणसेंच होतां, पण अगदीं विद्याहीन मूर्ख, जसे राक्षस तेवढे. मारावें नी मरावें, हेंच तुम्हाला ठाऊक होतें. मराठशाईत जे बेबंद होते ते बंड मोडून तुम्हास विद्यादान कोटयावधि रुपये खर्चून दिलें. नानाप्रकारचें कलाकौशल्य, कायदेकानु ठिकठिकाणीं कचेऱ्या दरबार करून सर्व स्वस्थता राखिली. डोंगर फोडून आगगाडीसारखा महान विशाल अग्निरथ त्यांतून जाण्यासारिखे मार्ग पाडिले. कधींकाळी व्दापारयुगांत अजिंठा, कारलें

नाशिकाजवळ हें माझ्या माहितींतले ; पण पृथ्वीतलावर अशीं लाखों लेणीं आहेत, तीं पांडवांनीं अज्ञातवासांत फिरत असतांना कोरिलीं, असे हल्लीचे लोक म्हणतात. तरी ते पांडव ती द्रौपदी पाहिली कोणीं. पण आतां हे शककर्ते बरीक खरे पांडव आहेत. पोथींत, रामविजयांत इंद्रजितानें हवन करून अग्नितून रथ काढला होता असें श्रीधरस्वामीनें लिहिलें ; पण तो रथ या सध्या चालू अग्निरथाप्रमाणें अगणित ओझें नियमित वेळीं नियमित ठिकाणीं वाऱ्यासारिखा नेऊन पोंचवीत नसेल. असे अनेक प्रकारचे अदभुत चमत्कार जितके वर्णावे तितके थोडेच. रात्रीस सोन्याचे गोळे पाठीशीं बांधून चालले जा. कशाची भीति नाहीं. असें जें हे सरकार त्यानें तुमच्याकरितां तर सारेच सुखोपचार केले आणि त्यांनीं या धर्मात हात घालून, अबलांस सबला करून त्यांना तुमच्या या पोकळ धर्मरूप यातनेंतून त्यांनी न सोडवावें तर मग कोण सोडवील बरें ?

'वैभव'राव म्हणतात कीं, ''आजपर्यंत सरकारनें जे जे कायदे केले, ते ते केवळ चंचुप्रवेशाप्रमाणे केले.'' तेव्हां या त्यांच्या लिहिण्यावरून तुम्ही राजद्रोही कृतघ्न आहांत. ''विधवांचें केशवपन केलें तर बावनखणीसारख्या शेकडों गृहशाला व विजयालक्ष्मीच्या थाटासारिखे खटले तोडण्याकरितां सरकारला अनेक नवीं नवीं कोटें तयार करणें प्राप्त होईल.'' तर बावनखणीसारख्या गृहशाला बांधण्याऐवजीं सरकारास एकएकीकरितां एक एक लहानसें गोजिरवाणें घरच बांधावें लागेल, व तुमच्याकरितां बरीक मोठें टोलेजंग कारागृह करणें भाग पडेल. कसें म्हणाल तर जिचा जिचा सरकार पुनर्विवाह करून देईल ती ती त्या लहानशा गृहराष्ट्रांत आपल्या नूतन पतीबरोबर आनंदांत राहून सरकारास आजन्मपर्यंत कल्याण इच्छील व त्या विशाल चिरेबंदी कोटांत ह्या व्याघ्ररूपीं कामांध मद्य प्राशनानें धुंद व मांसहारानें तुंद झालेल्या बोकडास नेऊन सांठवील, तर सरकारास थोडया खर्चात लक्षावधि नरपशूंपासून कामें घेतां येऊन, गरीब बिचारे बैल, हेले, घोडे व गाढव यांना आतां सांप्रत जे कष्टामुळें हाल सोसावे लागतात, ते न लागून सरकारास पुण्यप्राप्तीची व आपल्या खजिना भरण्याची एक पर्वणीच येईल.

एकदां आईबापांनी कन्यादान करून तुमचे हातावर पाणी सोडलें म्हणजें झालें. मग ती तें सोडतात, त्यांना अंतरते. अहाहा, जे आईबाप जन्मल्या दिवसांपासून त्या मुलीस काळजाचे घडाप्रमाणें आपल्या शक्तिसामर्थ्यानुरूप लाडानें, कौतुकाने लहानाची मोठी करितात, तिला चांगलें सुस्थल मिळावें म्हणून ते किती झटतात, तिचे सासूसासऱ्याची खुशामत करून यांनीं आपले मुलीस फक्त चाहून चांगले ममतेनें वागवावें म्हणून त्यांची किती मर्जी राखतात ; पण तिचे प्रालब्धानें वरें मिळालें तर बरें नाहीं तर मग काय ? जन्मभर ती आईबापाचे जिवास करवत ! जिला ज्या आईबापांनीं कधीं एक पांच बोटाची

चापट दिली नसेल तिच्या पाठींत तुमच्या हाताचे सपाटे बसत असतील तेव्हां तिचा व त्यांचा जीवं कसा होत असेल ? आतां याविषयीं सर्व कच्ची हकीकत लिहूं गेलें तर एक रामयणच होईल. बाहेर तुमची कृति केवळ जशी खालीं फाटली घोंगडी पण वरती लाल भरगच्ची किनखापाचें आस्तर याप्रमाणें असती. तिला तुम्ही उभी सोन्यानें मढवून जरी एका मोठया रत्नखचित मंदिरांत ठेवून तिच्याशीं ममतेनें न वागलांत, तर तिला कसे वाटून दु:ख होत असेल व होतें हें प्रत्यक्ष अनुभवावांचून सांगणें कठीण. असो.

स्त्रिया निरंतर या संसारांत नानाप्रकारचें कष्ट, हाल, तहानभूक, जाच, हाणमार सोसून, फक्त एक तुमच्या गोड शब्दाच्या भुकेल्या असतात. तुम्ही कमावून आणणार पण त्याची पुढें सर्व व्यवस्था लावून, तुमचे मर्जीप्रमाणें वागून सदासर्वदा अर्ध्या वचनांत अज्ञांकित राहून या शरिराचे रति रति तुकडे पडून हाडाचे मणी व रक्ताचें पाणी होईतोंपर्यंत अतोनात कष्ट करून, सदा तुमच्या मुखाकडे नजर. तिच्याकडे पाहून जरा तुमची खुषीत हासून दांतखिळी उकलली म्हणजे तिला त्या आनंदापुढें त्रिभुवन ठेंगणें वाटतें. पुन: हें असें कष्टाचे ओझें उचलण्यास आणखी नवें नवें काम शिकण्यास व करण्यास तिला उल्हास येतो. हें तुम्ही आपल्यावरून पहा. तुम्ही म्हणतांना कीं, ''अमृतं स्वामीगौरवं'' तिनें जर कांहीं एखादें सुरेख शिवणकाम तयार करून तुम्हाला दाखविले, अगर एखादें नाजूक पक्कान्न निगुतीनें करून वाढलें, ते वेळेस ''वा भले शाबास ! हें तूं स्वत: केलेंस ना ! अग, इतकी मेहनत नको करूं. तुझी पाठ अगर डोळे दुखतील. मुलाचे हाल करूं नको नी वैद्याचें दार पहावयास लावूं नको. चांगलें सुखाचें रहा,'' अगर एखाद्यानें आपले मित्राजवळ, स्नेहमंडळांत ''मी फार नशिबवान आहें कीं, मला घरांत कांहीं पहावें लागत नाहीं. घरीं आपलें नेऊन टाकावें मग कांहीं करो. आमच्या घरचेसारखी दुसरी सांपडणें कठीण,'' असे इतकें ममतेचे व भूषणाचे शब्द तिच्या कानीं पडल्याबरोबर ती तो लहानपणापासून जाच, व तुम्हीही तिला कित्येक वेळ लाथाबुक्क्या मारल्या असतील, शिव्या दिल्या असतील तें सर्व विसरून त्या स्वामिगौरवांत, आज मजसारखी भाग्यवान या भूतलावर दुसरी कोणीच नसेल. असें मानून किती बरें तिचें अंत:करण सग्दद होत असेल. तेव्हां असें तुमचें इतके क्षुल्लक प्रीतीचे अतुर असूनही त्यांस नानाप्रकारचे निंद्य विशेषण दिलें, तेव्हां हें त्यांचे प्रालब्धच म्हटलें पाहिजे.

अहारे दैवा ? काय रे तुझी विचित्र गति ? कोणाला तरी कळली असेल काय ? अरें, आजन्मपर्यंत बटकीप्रमाणें ताबेदारींत राहून सदासर्वदा नवऱ्याची मर्जी अति नाजुक, ताजव्याचे काटयासारखी तोलून, घरांतील सर्व मनुष्याचें जें नाहीं ते सर्व बोलणें व कष्ट सोसून, सदोदीत भाडयाचे बैलासारिखे राबून हरिणासस्यासारखी रात्रंदिवस जनांची, घरच्यांची भीति बाळगून वागत असतांही स्त्रियांना एक शब्द बोलण्याची, अगर चिमटीभर दाण्याची

सत्ता नसावी कायरे ? अहारे, विधात्या, त्यांचे ललाट पटावर कसेरे शिक्के मारिलेस ? अरे, त्यांना असें करणें होतें तर तूं त्यास उपजतच मारून टाकतास तर तुला आज लक्षावधि शिव्यांच्या लाखोल्या कशाला मिळत्या बरें ? कोण वाहतो बरें ?

अहारे, धन्य तुझी, तूं आपल्या स्वजातीला सर्वोपरी मोकळया ठेवून या स्त्रियांना कसें रे पाशबध्द केलेंस ? यावरून तुला देखील पुरुष जातीचा अभिमान आहे ना ?

अरे, तुम्ही देव ना ! तुमचेजवळ मुक्तव्दार, पक्षपात नाहींना मग हे कायरे ! पक्षपाताचा बाप झाला ना हा ! अरे, पुरुषांला तशीच स्त्रियांना तूंच निर्माण केलेंस ना ! तर त्यांना सुख व यांना दु:ख अशी निवडानिवड का रे केलीस ? बाबा तूं तर करून चुकलास. पण त्यांना सोसणें भाग झालेंरे झालें.

स्त्रियांना पुष्कळ तऱ्हेचे दोष दिलेले वाचण्यांत व रोजच्या वहिवाटींत ऐकूं येतात. पण जे दोष स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरुषांत अजीबात नाहींत काय ? जशा बायका लबाडी करितात तसे पुरुष करीत नाहींत काय ? चोरी, शिंदळकी, खून, दरोडे, दगाबाजी, सरकारी पैसा, लांच खाणें, खऱ्याचें खोटे, खोंटयाचें खरें करणें, यांतून एकही अवगुण पुरुषांत नाहीं काय ? जे वेळेस कैकैईनें श्रीरामचंद्रजीस चौदा वर्षे वनवासांत ठेवून माझे भरतास अयाध्येचे गादीवर बसवावें म्हणून दशरथराजास सांगितलें तेव्हां त्या अध्यायांत स्त्रियांविषयी बरेंच लिहिलें आहे. पण ते वेळेस सत्ययुगांतील पुरुष तरी किती सत्यवादी होते. ते एकदां वचन दिलेले कधी फिरवीत नसत. कधीं वचनाला ढळत नव्हते. हरिश्चंद्राने स्वप्नांत राज्य ब्राम्हणाला दान केलें तेव्हां विश्वामित्रानें अतोनात छळीलें. शिबीराजानें कपोत पक्ष्याबरोबर आपले सर्वांगाचे मांस काढून ताजव्यांत तोलून दिलें. यौवनाश्वराजानें सत्व राखण्यासाठीं आपलें उभें शरीर श्रीकृष्ण परमात्मा व्दारकाधीश यांना करवतानें करवतून दिलें. तसेंच राजा दशरथानें कैकैईचें वचन केवळ सत्यतेची वाणी राखण्याकरितांच श्रीरामचंद्रजीस वनवासास पाठविलें. असे ते सत्यवादी होते. म्हणूनच ते वेळचे लोकांनी तीन हट्ट कायम केलेत. एक स्त्रीहट्ट, दुसरा बाळहट्ट, व तिसरा राजहट्ट. पण आता सांप्रतच्या स्थितींत एकच खरा राजहट्ट. त्याच्याखालीं बाळहट्ट, पण स्त्रियांचा हट्ट किती व कशा रीतींने पुरा होतो हें सांगता येत नाहीं. एखादीने जर हट्ट केलाच तर, लांकडाखालीं पाठीचे साल निघून, त्या हट्टाची वर्ष सहा महिने आठवण राहण्यापुर्ती बेगमी होती. असा आतां स्त्रीहट्ट या मासल्याचा आहे. तेव्हां हट्ट करती कोण ? तुकीची पाठ पाहिली कीं पुरे ? असो ; तरी एकच ओवी येथें घेतली म्हणजे सारांश लक्षांत येईल,

॥ ओवी ॥

स्त्री केवळ कुऱ्हाडी । सबळवृक्ष तोडी ॥
प्राणी नाडिले लक्षकोडी । मूर्तिमंत भवव्याधि कामिनी । जाणपा ॥ १ ॥

॥ श्लोक ॥

आवर्तः संशयानामविनयभुवनं पत्तनं साहसानां ।
दोषाणां सान्निधानं कपटमयतरं क्षेत्रमप्रत्ययानां ॥
स्वर्गव्दारस्यविघ्नं नरकपुरमुखं सर्वमायाकरंडं ।
स्त्रीयंत्रं केन सृष्टं विषयममृतमयं प्राणिनां मोहपाशः ॥ २ ॥

आतां इतके दोष त्यांचे माथ्यावर शेकून तुम्ही सद्गुणाचे पुतळे झालांत !

स्त्री जर कुऱ्हाडीसारखे तुमचे पुण्यवृक्ष तोडिते, तर अशा या प्राणघातक कुऱ्हाडीस प्राणापेक्षां चाहून तिचे पोषणार्थ तुम्ही आपले जन्मचें, जन्म कां ताबेदारींत व हरएक प्रकारचे व्यवहारिक कामांत बैलासारिखें राबून घालविता ; तुमच्यापेक्षां बैल बरा. त्याला त्याची स्वतःचीच काळजी मग तिकडे कांहीं होवो.

प्रथम स्त्रीरूप यंत्रामध्यें जारण-मारणापेक्षां बलिष्टता आहे तर तिजपेक्षां बुध्दीच्या मानानें तुम्ही जास्त बलिष्ट आहां. तुमच्या बुध्दिबळानें तुम्ही काय एक केलें नाहीं बरें ? जें अघटित तें करून दाखविलें. तुम्ही जे महापराक्रम केले तेथें स्त्रीजातीची बलिष्टता किती ? कांहीच नाहीं दुसरें, स्त्रिया अनेक संशयाचा परिभ्रम-भोंवरा हें खरें ! कारण त्या अशिक्षित असल्यामुळें हरएक प्रकारचे संशय त्यांचे मनांत वास करितात. तरी त्यांच्या मनांतला संशय फक्त त्यांच्या संबंधापुरतांच असतो. पण तुमच्या मनांतले संशयाचें चक्र जर पाहूं गेलें, तर त्यावर नजरसुध्दां ठरणार नाहीं. तुमचीं मनें नानाप्रकारचीं, देशी व परदेशी मानसिक व्यवहारिक दगाबाजीनें अगदीं संभ्रमित असतात.आज अमक्या सावकारास अशी थाप देऊन या रीतीनें त्याचे जवळून एक हजाराचा तोडा उपटावा. त्या अमुक जहागिरदारास असे कळवून त्याकडून कसे तरी चार पांचशें हबकावे. आज साहेबाला असें सांगून त्या अमुक खटल्याचा निकाल अमुकतर्फे करावा. तो खोटा दस्त ऐवज आज नोंदवून आणावयाचाच. आज ती फलाण्याची मोठी नखरेबाज, मोठी नाकानें कांदे सोलती. तिला कसे तरी एकदा गाठावयाचेंच ; व हें पहिलें लचांड तोडून एकदाची ती पीडा टाळून टाकावयाचीच ! तेव्हां अशा प्रकारचे संशय स्त्रियांचें मनांत कधींच येणार नाहींत. तरी या जगांतील सर्व स्त्रिया प्रखर सूर्याच्या तेजाप्रमाणें सतेज, अंतर्बाह्य गंगाजलाप्रमाणें निर्मळ

आहेत असें मुळींच नाहीं. पण सर्व पृथ्वीतील स्त्रिया गोळा केल्या तर तुमच्यासारख्या संशयाचे भोंवऱ्यांत सांपडलेल्या शेंकडा दहा सांपडतील. पण तुमच्यांत एक देखील या भोंवऱ्यानें वेगळा सांपडणार नाहीं.

तिसरे, स्त्रिया उद्दततेचें केवळ गृहच. यात आपली जाति काय कमी आहे ? वजन करूं गेलें असतां शंभर दीडशें तोळे पारडें खालींच जाईल. चौथें स्त्रिया अविचारी कर्माचें नगरच. तर स्त्रियांचेच हातून अविचार घडतात ? आणि तुम्ही पाजी. बेइमान, भरंवसा देऊन केसांनी कापणारे जे तुम्ही, त्या तुमच्या हातून कधींच अविचार होत नाहीं ? तुम्ही अगदीं विचारमंदीरे ! अहारे शाबास ! अरे, तुम्ही महापढीक शहाणे व विचारी असून तुमचे हातून नभूतो नभविष्यति, असे अविचार घडून व रोज घडत असतांही तुम्ही मोठे विचारी म्हणवितां याला काय म्हणावें ?

स्त्रिया केवळ गोठणांतील म्हशीप्रमाणे मूर्ख. त्यांना ना लिहिणें ना वाचणें, म्हणून का ईश्वरानें त्यांना कांहींच बुध्दि दिली नसेल काय ? तरी त्या अविचारी असूनही तुमच्यापेक्षां बऱ्या. तुम्ही शहाणे आहात खरे. पण इकडे कारागृहांत जाऊन पहावें तों पाय ठेवण्यास देखील जागा मिळत नाहीं, इतकी तेचें आपल्या देशबांधवांची दाटी असते. तेथें काय सर्व शहाणे. कोणी खोटया नोटा केल्या म्हणून, कोणी लांच खाल्ला म्हणून, ** कोणी कोणाची बायको पळवून नेली, कोणी बंडात सामील, कोणी कोणाला विषप्रयोग केला, कोणी राजद्रोह केला, कोणी खोटी साक्ष दिली, कोणी तोतया राजे बनून लोकांस बुडविले, कोणी खून केले, हा अशी अशी विचाराची मोठमोठीं कामें केल्यावरून सरकारनें तुम्हाला मोठया आदरानें या सुंदर बंदीशाळेसारख्या रंगमहालांत जागा दिली, पण असे अविचार कोणते स्त्रियांचे हातून घडतात बरे ? असे किती कारागृह बायकांनी भरलेत दाखवा ? जेथें तुमची दोन तीन हजार मंडळी, त्यांत फार झालें तर शंभर देखील स्त्रिया निघणार नाहींत. स्त्रियांचे हातून मोठा अविचार कोणता ? तर परव्दार हेंच काय तें मेरूचें शिखर व याचे पायींच त्यांचे हातून अविचार होतो. पण जी परव्दार करते तिच्या मनांत ही दुष्ट वासना उत्पन्न करण्यास आधीं पुढें पाऊल कोण टाकितो बरें ? ती किंवा तुम्ही ? स्त्री कितीही निर्लज्ज असली तरी ती होऊन कधीं परपुरुषांचे गळयांत पडणार नाहीं. ही अगदीं खात्री. स्त्रियांना सर्व जगिक सुख म्हणजे काय ? एक तर प्रथम मनासारखा नवरा. अत्यंत प्रीति करणारा. त्याचें तिचें एक चित्त असलें तर ती दरिद्री असूं द्या. झोंपडींत अन्नवस्त्राचें हाल, जांच, सर्व प्रकारचे हाल-वनवास सोसून, फक्त त्या एका प्राण्यावर नजर देऊन दु:खांत सुख मानून या कृत्यास कधींच प्रवृत्त होणार नाहीं. बरें हेंही कृत्य म्हणजे मोठें अविचाराचें, मागें कधींच घडलें नाहीं असेंही नाहीं. तुम्ही शास्त्रांचे बळानें उडया मारता. पण शास्त्रांत जो घाटाळा

आहे तो आतां सांप्रत नाहीं. पूर्वी एक राजा मेला, आणि त्याच्या पोटीं पुत्रसंतान नसलें तर त्याच्या राणीनें जो मनास आवडेल त्या ऋषिपासून वंशवृध्दि करावी. मग राणीसाहेबानीं त्याला दहा मुलें होईतां ठेवून घेतलें म्हणून काय झालें ? मग यांत काय झालें ? हें नाहीं का परव्दार ? हा व्यभीचार नव्हे का ? हें सशास्त्र झालें का ? असें करण्यापेक्षां दुसरें लग्न करण्याची जर चाल चालूं ठेविली असती तर त्या राज्याला दुप्पट बळकटी येऊन आज लक्षावधि लहान लहान मांडलिक राज्यें, जहागिरी, इनामें, देशमुख्या वगैरे बुडून आपला देश भिकारी झाला नसता. कित्येकांना औरस वारस नसल्यामुळें त्यांची सर्व जिनगी सरकारांत जाऊन सरकार खजिन्यांत पडली. कित्येक ठिकाणीं सर्वच बायका बोडक्या झाल्या, त्यांचा बाजार पहाण्याला कोणीच नाहीं, तेव्हां तुम्ही टोळासारिखे पडून सफई सत्यानास करून सोडलात. अरे, ज्यांच्या पायांला माती लागत नव्हती अशा राजेरजवाडयांच्या राजांगना देवांगनासारख्या रूपवत्या होत्या ; पण या तुमच्या अधाशी मतलबामुळें त्या भिकेंस मिळून देशोधडी लागल्या. तेंच त्यांना दुसऱ्यानें लग्न करण्याची मोकळीक असती तर अशी त्यांची दुर्दशा होती का ? कधीं न होती. एकदां नवरा मेला कीं बसलें मग शिळेंसारखें. एक प्राणी जातो ; पण त्याच्या करतां चार, पांच, दहा जिवांची दशा होऊन मातींत मिळतात. पहा, एकीला पोर न झालें कीं दुसरी, तिसरी, चौथी, चाललीच संख्या वाढत. मराठयांत, देशमुखांत पहा, एकएकाला चार, पांच, निदान तीन बायकांला तर खोटच नाहीं. एखादे दिवशीं बुवांनीं स्वर्गाचा रस्ता धरला कीं, या एकदम जितक्या असतील तितक्या बसल्या मग कपाळाला बडवीत. मग इकडे वंश असो, कां नसो. असो.

**अरे, पहा सरकारांनी तुम्ही सरकारचे काम इमानानें करावें, म्हणून तुम्हाला तुमची योग्यता, विद्वत्ता पाहून दहापासून शंभर, दोनशें, तीनशें, चारशें, पांचशें, सातशें, हजार दीड हजारपर्यंत दरमहा पगार करून तुमच्यावर अगदीं पक्का भरंवसा ठेऊन, स्वस्थ तुम्ही म्हणतां तें म्हणणें कबूल करून फक्त कागदावर सह्या करण्याशीं कामे ठेवितात. यांत काय त्यांचा अपराध ? पण तुम्ही तो पगारही घेऊन श्रीमंतांपासून तसेंच गरीबापासून, रोख रुपये, घोडे, गायी, म्हशी, कापड, सोनें, भांडे, निदान काही नाहीं तर जोडे देखील घ्यायला कमी करीत नाहीं. यावरून तुम्ही राजद्रोही बेइमानी नव्हे कायरे ? अरे, कोठून कांहीं जरी नाहीं मिळालें, तर एक दिवसाचा शिदाच. कोठून जांबच, उसाची दोन कांडींच, कोठें थोडासा गुळच, कोठून एक लांकूडच, कोठें नुसतें जोंधळयाचें भूसच, कोठून कांहींना कांहीं पण उपटाल ! त्याला तसा कोरडा बिन भीक मागितल्यावांचून अगर त्याचेजवळ दांत विचकल्यावांचून तुम्ही त्याला जाऊं द्याल ? छे, असें कधी होणार नाहीं. असे तुम्ही सदा भिकारी. अरे, तुमचे सर्व गुणवर्णन करू लागलें, तर कागद ठेवण्याला जागा मिळणार नाहीं. हें सर्व सृष्टितले

कागदानें भरून जाऊन, शाई करतां करतां समुद्र आटून जाईल व लेखण्या तासण्याकरितां सुतार ठेवावे लागतील ! असो.

स्त्रियांची मने फार हलकीं व अल्पसंतोषी असतात. तुमच्यासारख्या, नित्य आपल्यास मोठा हुद्दा व पैसा कसा मिळेल, लोक आम्हाला मानमान्यता देऊन, 'या गोमाजी कापसे' असें कधीं म्हणतील. नाना प्रकारचीं अशा आपल्याच घमेंडीच्या अनेंक विचारांत बायका गुंतत नसतां आणि असाध्य कृत्यें साधण्यांत आपलें आयुष्यचे आयुष्य त्या घालवीत नसतां तुम्ही नामानिराळें होऊन अविचाराचें ओझें स्त्रियांचेच माथीं मारतां याला काय ह्मणावें ?

पांचवे, सकलदोषांचें निधान. सकलदोषांचें निधान प्रथम तुम्ही. तुह्मीच स्त्रियांना दोषपात्र होण्यास कारणभूत होता. ऐका ; कित्येक बाप आपल्या नक्षत्रासारख्या दहा अकरा वर्षाच्या मुली ऐशी नव्वद वर्षाचे श्रीमंत ह्मातार्‍यास रुपयांची थैली घेऊन व त्याचे श्रीमंतीवर नजर देऊन, ''नवरा मेला तरी चिंता नाहीं, इला पैशाला तर कांहीं कमी नाहींना ? दोन दिवस खाईल, पिईल, लेईल, नेसेल. एक नवरा नसला तर काय चिंता आहे ?'' असें ह्मणून वाघाला जशी बकरी द्यावी त्याप्रमाणें बेधडक देतात. अरे, पण जें खरें सुख, खरी ममता, ज्या लेण्यानेसण्यानें ज्याला आनंद, जो तिचें कौतुक करणार, तिला प्राणापेक्षाहीं चाहाणार, तो तर गेला. मग तिला हें जग अरण्यासारखेंच. तिला ते कोरडे सोहाळे कशाला रे ? पूर्वी सती # जात तें बरें होतें. एकदांचे त्यांचेबरोबर आपलीही राख केली ह्मणजे सरलें. या जगांत बायकोवर जसा नवरा प्रीति करील तशी आई वेगळी करून कोणी दुसरें करणार नाहीं, जे तरुणपणाचे प्रज्वलीत इंगळ पदरांत वागवून दिवस काढावे बरें ? असो ; फक्त द्रव्यावर नजर देऊन मुलीं अशा ठिकाणीं देतात त्यांची अशी स्थिति.

# मग पुण्यास सार्वजनिक सभा आहेना त्यांनी स्त्रियांवर मोठाच उपकार करून त्यांचें जें दर सहा महिन्यानीं का वर्षानी पुस्तक निघत असतें त्यामध्यें मोठ्या डौलानें लिहिले होतें कीं, ''सरकार स्त्रियांना सती जाण्याची मोकळीक देईल तर बरें ?'' पण स्त्रिया सती जाऊन तुम्ही त्यांच्या मागें गवर्‍या वळायला कां रहाता ? तुमच्या बायका मेल्या, ह्मणजे तुम्ही त्यांच्याबरोबर कां सती जाऊ नये बरें ? तुमच्यापेक्षां ती सती गेल्यानें फार नुकसान होईल ; कसें ह्मणाल तर, ती मेली ह्मणजे तिच्या मागें तिचीं लहान लहान मुलें असतात. त्यांना कोणी संभाळावें ?

अरे, म्हण आहे, ''घोडेफेरता बाप मरावा, पण राहटानें सूत कांतणारी आई मरू नये.'' बाप जर मेला तर ती आई पाहिजे तसें दुःख सोसून मुलांना पोशील ; पण तुह्मी

आज ती मेली कीं उद्यां दुसरी करून त्या मुलास देशोधडी करता. करता कीं नाहीं हें ? पहा रोज बोंब ऐकू येतेच. याकरितां बायकोच्या आधीं तुम्हालाच त्या कुंडात टाकावें.

कोणी सवतीवर मुली देतात. पण सवतीसारखें स्त्रियांस निरतंर कांट्याप्रमाणे सलणारें दुसरें शस्त्रच नाहीं. नवऱ्यानें अंमळ एखादीकडे जरा नीट न्याहाळून पाहिलें तर बायकोची तळची आग मस्तकास जाते. ह्या तर नुसत्या पहाण्याचा प्रकार. मग अगदीं धडधडीत लग्नाची ह्मणा अगर ठेवलेली ह्मणा, बाहेर अगर घरांत जर ठेवील तर ते तिला कसें सहन होईल बरें ? बरें, त्यांतून दोघीला समसमान वागविणारे मुळींच सांपडणार नाहींत. कारण दागदागिने वस्त्रप्रावर्ण वगैरे प्रकारांत बरोबरी पाहिजे तितकी ठेवील ; पण एकसारखी दोघींवर प्रीति राहील का ? कारण प्रीति कांहीं आंबा, जांब नाहीं म्हणून वाटून घेतां येईल, प्रीति ही केवळ दुधाप्रमाणें आहे. दूध एकदां नासलें ह्मणजें जसें त्यांचे फिरून दूध होत नाहीं तशी ही प्रीती एकदा फाटली म्हणजे ती पुनः कधी जुळत नाही. तितक्यांतून कोणाचीच काय, नव्या जिनसेवर स्वाभाविक आवड असतेच. फार दूर कशाला, तुमच्यांतून कोणा एकाचे बायकोनें त्याच्या देखत दुसऱ्या पुरुषाकडे जरा रोखानें पाहिलें कीं, त्यांचा काय विस्तवाप्रमाणें संताप होतो. त्याकरितां तिची जनांत किती फजिती करितां, तिला मारहाण किती होते, तिजवर जप्ती किती असते. तसें तुम्हाला कां नसावें ?

तुम्हाला नुसतें पाहाणें सोसत नाहीं तर तिचे उरावर ही जीवंत जळत शेगडी तिला सोसेल का ? अशा सवतीवर कोणी मुली द्याव्या का ? कोणाला लेकी फार असल्यामुळें आल्या वरास देतो. मग तो कसा का असेना ? कोणी धादांत कुलांगारास दृष्टीनें पहात असतांही तेथेंच मुलीला लोटितो. कोठें नवरा कुरूप, दुर्गुणी, हीनवर व अतिशय जाच, हाणमार, फार जप्ती, खाण्यापिण्याचे हाल अशा अनेक आपेष्टा करणारा असला तरी त्याच्या स्वाधीन कसाबाच्या हातीं गायीप्रमाणें कोणी आपल्या मुली करितात. त्या अपेष्टा येथें लिहिल्या तर एक गाडाभर कागद पुरणार नाहींत. तेव्हां या अशा कारणामुळें जर स्त्रिया निघून गेल्या तर तो दोष कोणाचा ? त्या बापाचा का लेकीचा ?

आतां डागडागिन्याकरितां किंवा फक्त मनाचे खुषीकरितां, सर्व सुख, त्यांतून मुख्य नवरा मनासारखा असूनही, अशा निंद्य कामास प्रवृत्त होणाऱ्या फारच थोड्या सांपडतील. आतां तुम्ही म्हणाल कीं, राजाचे येथें का सुख कमी असतें ? मग त्यांच्या बायका कां ह्युजरे बिजरे ठेवितात ? पण मोठे श्रीमंत व राजें यांचे येथें, ते जातिनिशी अतिशय दुर्वर्तन करणारे असून वर्ष वर्ष सहा महिने त्यांना घरची राणी किंवा बायको इचें दर्शनच नसतें. ह्यामुळें बायकांना किंवा राण्यांना सुख म्हणून अगदीं नसतें. मग त्यांनी काय करावें ? तेथें तर त्या सदा ऐश्वर्यात. सुखांत, खाण्यापिण्याविषयीं तर पहाणें नकोच. मग त्यांनीं त्या

कुसुमचापास कोणत्या रीतीनें आवरून धरावें ? ‘आई जेऊं घालीना, बाप भीक मागूं देईना.’ असें जेव्हां होतें तेव्हां मग त्या डुकरीसारखे शेतखान्यांतून तोंडें खुपशितात. हा एक प्रकार. पण या दोषास त्यांना कारणभूत तुम्हीच. तुम्हीच जर एकपत्नीव्रतानें वागला तर त्या असें कशाकरितां करित्या बरें ? आतां दुसरा प्रकार ; सर्व सुख अनुकूल असूनही कांहीं बायका फसतात. पण तें केंव्हां ? तुम्ही आपले स्तुतिपाठ तिचे कानांत युक्तीप्रयुक्तीनें सांगून हावभाव दाखवून, ‘महाराज सरकार, मी आपला दास, गुलाम, चाकर आहें एकदा मजकडे प्रेमानें अवलोकन करा. मी आपल्या एका शब्दाचा भुकेला आहें. मी तुम्हाला कंठांतील माळेप्रमाणें वागवीन. तुमचे अर्धे वचनांत राहीन, पालखींत बसवीन, पायांला मळ लागूं देणार नाहीं, जोडा दांतांत धरून फिरेन.’ अशी जेव्हां तिची नित्य पाठ पुरवीत असाल, तेव्हां बिचारी ते तुमचे मृगजलाचे बोल खरेच अमृतनिधि आहेत असें समजून टाकिते उडी.

येथें तुह्मी आडवाल की, एक फसली, तिची दशा पाहून मग दुसऱ्या ते तिचे प्रत्यक्ष हालवनवास पहात असतांही कां उड्या टाकितात ? तर तितकें मन आवरून धरण्यास ईश्वरच जवळ असला पाहिजे. कारण संगतीचा जोर फार असतो ? जे आपणास ज्ञानाचे सागर असें ह्मणवितात ? ते नाहीं का नित्य कोणत्याही प्रकारचें साहस करण्यास धजत ? एकानें केलें तसें दुसरे मुळीं व न करतें तर आज लक्षावधि प्राण्यांचें उपजीवन दरबारी संबंधानें झालेंच नसतें.

अरे, तुम्ही काय महा ठक, तुम्हीं विजेलादेखील सोडलें नाहीं. तेथें यःकश्चित बायकांची रे कथा काय ? टाळी दोहों हातानीं वाजते खरी, पण त्यांतून उजवे हाताचा जोर ज्यास्त असतो.

कित्येक श्रीमंत गृहस्थ आपल्या लाडक्या लकीचे फक्त लाडाकरितां व आवडीकरितां एखादे गरीबाचे मुलाबरोबर लग्न करून जें जोडपें जवळच बाळगितात. पुढें जोपर्यंत ती उभयतां अज्ञान व असमंजस असतात तोंपर्यंत बरेंच चालतें. एकदां जरा चांगले समजूं लागलें म्हणजे ही बया श्रीमंताची, सदा ऐषआरामींत वागलेली चतुर, हुशार, नी बाबा म्हणजे जन्मकरंट्याचे. ऐष आराम, चतुरता, हुशारी यांच्या बापाला ठाऊक नव्हती, ती यांना कांहीं पूर्वपुण्याईनें मिळाली असते. पण त्या ऐश्वर्यासारखी वागणूक यांना कोठून येणार ? हे जन्मदरिद्री ताकाबरोबर शेवया खाणार. कुलहीन गाढवाला रोज दोन वेळ खरारा करून व दहा शेर दाणा देऊन वर कलाबतु, जीन, कलगी, गेंदजोडी घालून जरी सजविले, तरी तें खानदान, रोडक्या व अगदीं शरपंजरी पडलेल्या घोड्याची बरोबरी करील काय ? तेव्हां तिला तो न आवडून, ते केवळ शालजोडीला रकट्याचें ठिगळ याप्रमाणें होऊन पुढें जे प्रकार होणें ते होतात. ते येथें लिहून दाखविणें नको. रोज जे धिंडवडे होतात ते ते दृष्टीस पडतातच. तो

बापाचा लाड तिला जन्मभर कामीं येतो का नाहीं बरें ? तेंच पहिल्यानें योग्य वर योजून जर देते तर त्यांना उभयतांना आनंदांत नांदतांना पाहून किती सुख होतें बरें.

तुह्मालां जशी वाईट, कुरूप, दुर्गुणी, घाणेरी, गावंढळ बायको आवडत नाहीं, तसा बायकोला, तरी या मासल्याचा नवरा आवडेल का ? जशी तुम्हाला बायको चांगली पाहिजे, तसा तिला चांगला नवरा नको का ? अरें, तुम्ही जेव्हां लहान असून तुमचे आईबाप गरीब अगदीं भिकारी असतात, तेव्हां त्यांना त्या दरिद्रावस्थेंत मुलाचे लग्नाची मोठी काळजी असते. ते वेळेस कर्ज (ऋण) काढून कसें तरी तुमचें लग्न करून देतात. त्या वेळेस चांगली सुरेख मुलगी तुमच्या वाट्यास कोठून येती ? तेव्हां जरी घुबड असली तरी तुम्हाला तीच अपसरा वाटते. पुढें जरी विद्या सरस्वती प्रसन्न होऊन मोठा हुद्दा मिळाला, म्हणजे मग या पहिल्या बायकोची लाज वाटते. तुम्हाला पैशाचे बळानें बायको म्हणजे काय माल, असें वाटतें. जसा एखादा गडी, चार रुपये दरमहा देऊन स्वयंपाक करण्याकरितां अगर घर सांभाळण्याकरितां ठेवावाच लागतो कीं नाहीं ? त्याप्रमाणें एकदाच हजारबाराशें खर्चून ही एक सत्तेचीच बटीक विकत घेतली असें तुम्हास वाटूं लागतें. अरे, तुमची तुमच्या आवडत्या कुत्र्यावर अगर घोड्यावर जी प्रीती असेल तितकी बायकोवर नसते. बायको म्हणजे काय एक घरचा सोपा, आडगळ. तिला कोण पुसतो ? तिची कोण काळजी घेतो ? जशी एक घोडी मेली तर तुम्हाला दुसरी घेण्यास वेळ लागत नाहीं ; तशीच दुसरी बायको करण्यास तुह्माला आयास पडत नाहींत. एक मेली तर दुसरी तयार. गरीब असला तर तिला कांहीं जपतो. कारण त्याला ठाऊक असतें कीं, ही मेली तर दुसरी मिळणें कठीण. पण श्रीमंताजवळ तें देखील नाहीं. श्रीमंत तर रोज नवरे होण्याला तयार असतात. पण त्यांच्या बायका नेण्याला यमराजाला रोज रिकामपणच नसतें. नाहीं तर तुह्मी रोज दिवसांतून तीनदां नवरे व्हाल, यांत संशय नको. असो ; तेव्हां तिला ही माझी बायको ह्मणून ह्मणण्यास अगदीं जिवावर येतें. मग काय आधीं कोणी लौकर गोम्या ह्मणून देखील हाक मारीत नव्हतें ; आतां हुद्याचे व पैशाचे जोरानें आपासाहेब बाबासाहेब झाले ; ह्मणून त्या वैभवाला साजण्याजोगी स्त्रीही असावी असें वाटून मग त्या लग्नाचे वेळचे तुमचे चाळे पहावेत. असें बायका करतात का ? ती तर विपत्तींत तशीच सुपत्तींत तुमचे आज्ञेंत मर्जीप्रमाणे वागतेच कीं नाही ? का हा भिकारी कुरूप ह्मणून दुसरा करून जाते ? आतां इतकें होऊन कोण दोषी बरें ? स्त्रिया का पुरुष ?

सहावें, शतशः कापट्यांनी व्यापलेले कोण बरें ? अरे, कपटांत तर पहिला नंबर तुमचा. तुमचें कपट किती वर्णावें, पावलोपावलीं प्रत्यय येतो. अहा रे, काय काय सोंगें घेऊन, अंगावर पिंवळे, काळे पट्टे ओढून पटाईत वाघ बनता रे, अरे, गोसावी, फकीर, हरदास,

ब्रह्मचारी, साधु, दुधाहारी, गिरीपुरी, भारती, नानक, कानफाटे, जोगी, जटाधारी नंगे बनून सर्व त्याग करून रानोरान अंगास भस्म फासून व डोकीस जटा वाढवून हें सर्व जग कपटानेंच भोंदीत फिरतां ना ? 'हे कोण तर रामगीरबवा, हे कोण शास्त्रीबवा, हे कोण गणपतबवा फलटणकर महासाधु, हे नानकपंथी, काय बुवांची योग्यता ! किती सांगावी ; फारच योग्य ; मोठे निरपेक्ष, बुवा मंत्रादायक आहेत.' हें इतकें एकानें म्हटलें म्हणजे पुरे. मग बुवाचें जो जो प्रस्थ लांबत चालतें तों तों बुवा नित्य पंचपक्कानाचा खुराक खाऊन बोक्यासारखे एकदां ताजे बनतात नी मग बुवाचें देवदेवतार्चन बखळीत पडून बुवा जितक्या बायका दर्शनाला येतील तितक्यांतून ज्या काही निवडक नवयौवना असतील त्यांचें चिंतन करीत, 'हे सुंदरी हे सुंदरी,' अशी माळ फेरीत बसतात. मग गेलें ! 'शिवहरे' नाहीं नी कांहीं नाहीं. हा राधारूपी शिवहरी बुवाचे मुखांत बसतो. नेत्रांत या नुतन केतकीचें सुहास्य मुख व अंतरयामीं दामजीचा निजध्यास लागून बुवा धड वेडे ना धड शहाणे होऊन जातात.

हे कोण ब्रह्मचारी, तिकडून काशिकडून आलेत, महाप्रतापी, देवता प्रत्यक्ष हात जोडून उभी आहे, असे बुवा ! बुवाचेबरोबर पहावें तों, पालखी, मेणा, दहाबारा खंदे घोडे व घोडयासारखीच ताजी तुळतुळीत दहाबारा शिष्यमंडळी. कोणाचें नांव गंगादास, कोणाचें रामप्रसाद. मग बुवाची तारीफ कशी करावी हें गंगादास यांनी सांगणें नकोच 'आमचे महाराज फार साक्षात्कारी आहेत ; परवां उजाडगांवचे पाटलाला अगदीं मूल नव्हतें. पण बुवानीं विभूति दिली मात्र, झाला त्याला मुलगा, असे हे बुवा मोठे चमत्कारीक आहेत. कोणाचा कसा का रोग, भूतबाधा असेना. यांचें दर्शन झालें कीं पुरे, सर्व नाहींसें होतें. असें हे प्रत्यक्ष सांभाचा आवतार.' असें एकानें सांगितलें कीं, मग पुढें 'वाढवा' म्हणून या जगाला सांगणें नको ; पराचा कावळा हातोहाती होतो. आतां हा इतका बाबांचा डौल वरपांगी झाला. पण बुवाचे अंतर्यामीं जर कोणी पाहील तर तेथें स्त्री व धन यांच्या लोभाने दोन प्रज्वलित जाळ दृष्टीस पडतील.

अरे, गळ्यांत तुळशीची माळ घालून श्रीविठ्ठलाचे गुण वर्णीत हरदास म्हणजे प्रतिष्टित भिकारी होऊन फिरता ना ? काशिला जाता ना ? पण काशिस जाऊन दाढया मिशाचा सत्यानास करून परत आल्यावर तरी तुमचे मागले गुण जातात का ?

जशा मिशा श्रीभागीरथींला आर्पण करिता तसें दुर्गुणाचें पोतें भागीरथींत टाकून परतता का ? छे, मग तर अंगी ज्यास्ती आभिमान व पापवासना येते. वरून तर काय मोठे साधु बनता ; पण अंतर्यामीं जी कपटाची मशाल जळते ती कोठें भागीरथीचें पाण्यानें विझते का ?

अरे, तुम्ही संन्यासदीक्षा घेता ना ? मग तुम्हाला तर कशाचीच आशा नसावी. भगवीं वस्त्रें व हातीं दंडकमंडलु घेऊन हें सर्व जग प्राणीमात्र नारायणासारखें मानिता ना ? पण जेव्हां गंगातटाकीं सुंदर चिरेबंदी घाटावर स्नान करून शुचिर्भूत होऊन अंगास दोन दोन शेर विभूत फासून व गोमुखी हातांत घेऊन परमात्मा शेषशायी श्रीनारायण नामाचा जप करीत बसता, तेव्हां घाटावरचे पहिले पायरीवर पायांतील जोडव्यांचा आवाज झाल्याबरोबर तुमची नजर एकदम वरच्या पन्नास साठाव्या पायरीवर कां जाती ? मग त्यावेळेस तर गोमुखी हातांतून खाली पडून बुवांची एकच गडबड होऊन नारायण एकदम मुखांतून पळ घेतात. मग कशाचा आला नारायण ? हाच स्त्रीरूपी नारायण बुवांचे गोमुखींत जाऊन बसतो. ॥ बाह्यवेश मिरवी भगवा हे ॥ अंतरीं कुमतिचें भग वाहे ॥ हें कोणाला दिसतें ? दक्षणेचे पैसे सांचवून रांडेकडे जायाचे, इतकें करून महाराज संन्यासी !

अरे, देवदेखील स्त्रियांचे मुळावर, मग तुह्मी असल्याचें काय नवल ? कृष्णानीं आर्जुनाकडून महंताचे वेषानें सुभद्रेचें हरण करविलें, तेव्हा यादवांचीं मुलें 'गोसाव्यांनीं आत्याबाई नेली' असें म्हणूं लागलीं. पण आत्याबाईनें गोसावी नेला, असें तुम्हीं कोठें ऐकिलेंत का ? तसेंच रावण जेव्हां अतिशय अजिंक्य होऊन त्यानें सारें त्रिभुवन त्रासवून सोडलें, जिकडे तिकडे हाहाकार होऊन इंद्रपुरी ओस पडली, ते वेळेस क्षीरसागरी सारे देव व ऋषिगण जाऊन त्या शेषशायी भगवंताचा धांवा करून आम्हांला या दुष्टाचे त्रासांतून व दास्यत्वांतून सोडवा म्हणून करुणा भाकूं लागले, तेव्हां तो तर सर्व शक्तिमान इच्छामात्रें करून हे सर्व जग एका क्षणांत नाहीसें अगर उभें करणार ; तेथें त्या आगाध सामर्थ्यापुढें रावण काय माल बरें ? पण नाहीं. सीता जेव्हां त्यानें नेली तेव्हां वानरसेना जाऊन द्राविडीप्राणायाम करून त्याचा सत्यानास करण्याची जरूर होती ! तेव्हां तर तें झालें ; पण आतां जन 'अहो, जांऊ द्या, या रांडांच्या पायीं रावण कीं हो बुडाला, अशा या घरबुडव्या.' असें ह्मणू लागले ना ! का झालें ? आलें स्त्रियांचे माथीं ! सीतेनें दिव्य घेतलें तरी अपवाद चुकला का ? यांत रामचंद्रजीचे अंगीं फार मोठेपणा आला का ? वा रे, तुमचे देव, त्यांची पडछाया तुम्ही ; मग काय, ते एकपट पण तुम्ही दुप्पट खरें करून दाखविता. असें तुमचें कपट किती सांगावें ? ज्याला भावाचें नातें लावाल त्याचें कधी वाईट होईल, ही इच्छा सदा अंतःकरणांत गुप्त ठेवाल. जेथें बापाचे नात्यानें वागाल तेथें त्याच्या पिशवीला खार लावाल, व जेथें केवळ स्नेहानेंच राहाल तेथें तर त्याच्या बायकोपासून तर कुत्र्यापर्यंत नजर ठेवालच ठेवाल. सबाह्य निर्मळ रहाणारे पुरुषजातींत फार थोडे सांपडतील. तुम्ही पांच सहा मूर्ती एके ठिकाणी मिळालात म्हणजे काय. ''काहो, ते फलाणे आताशी मामलतीचा फारच डौल दाखवितात, एकदां नक्का खाली होईल तर बहार आहे. ते अमके राव आताशीं बरेच जमलेत, काय चमत्कार हो ! गाढवीच्याला खायला मिळत नव्हतें, पण आतां शिंदळीचा दोन

घोड्याच्या बगींत फिरतो.'' हें तुमचे काम. सारांश कावळ्यासारखें मनांत कपट ठेवून लोकांची गृहछिद्रें टोंचीत फिरायाचे. असें स्त्रिया करतात का ? सांगा बरें ? अमक्या बायकोनें असें गोसाव्यांचे अगर साधुचे वेशानें कोणी तरी पुरुष पळवून नेला काय ? अशी एक तर उगीच दाखल्याला तरी दाखवा बरें.

तशांतून स्त्रियांचा स्वभाव एकंदर हेवेखोर भोळा असल्यामुळें कशावरही त्यांचा तेव्हांच भरवंसा बसतो. त्या संतति, संपत्ति, व नवऱ्याची प्रीति संपादन करण्याकरितां काय करतील हें मात्र सांगवत नाहीं. याला उदाहरण, एका वर्तमान-पत्रांत असें लिहिलें होतें कीं, एका बाईस मूल होत नव्हतें तेव्हां कोणी कुचिष्ट भोंदू देवरुषांनीं तिला लहान मुलाचें * * * * गुळाबरोबर खाल्ल्यानें गर्भवती होशील असें सांगितल्यावरून तिनें तशी संधी राखून तें नामीं औषध घेतलें. पुढें त्याचा सर्वत्र बोभाट होऊन नवऱ्यानें तिची पाठ लाकडानें खूप नरम केल्यावर जनापवाद चुकविण्याकरितां तिनें जीव दिला. तेव्हां तिला जर कांहीं ज्ञानाचें अंग असतें तर ती अशा कामास कधींच हातीं न धरिती. नवऱ्याची ममता आपलेवरच असावी, त्यानें निरंतर आपले मर्जीप्रमाणेंच रहावें, याकरितां कित्येक जोशी, कानफाटे, बैरागी भोंदूलोक स्त्रियांना नादीं लावून फसवितात. ''लेकुरवाळें घर पाहून शनवारीं पोर्णिमा साधून आग लाव, ह्मणजे तुला मुलगा होईल,'' ''शनवारीं काळोख्या रात्रीं न्हाऊन डोक्यावर भदें घेऊन वस्त्ररहित अकरा मारुतीचें दर्शन घे, '' असें नाना प्रकारचें थोतांड ऐकून त्यावर त्यांचा त्वरित भरंवसा बसून, त्या अशा प्रकाराचें सहास फक्त मुलाचे आशेनें आणि नवऱ्याची मर्जी आपणाकडे निरंतर राहावी ह्या हेतूनं करतात. व त्यांचीं मनें भोळी असल्यामुळें अशा कामांत सहजीं गढून तें काम कितीही कष्टसाध्य असलें तरी तें करण्यास त्या मागें पुढें पाहात नाहींत. यावरून त्या किती मूर्ख, अविचारी आहेत हें सहजीं ध्यानांत येतें. या उलट त्या तुमच्यासारख्या आट्टल शहाण्या असून मनाप्रमाणें सर्व सुखांत असूनही जर असें करित्या, तर मग त्यांना दोष देणें बरोबर होतें.

आतां मोहनीं, तर स्त्रीजाति हीच मुर्तिमंत मोहनी आहे. स्त्री ही नखशिखापर्यंत मोहनाने भरली आहे. तिचे प्रत्येक अवयव, तिचा आवाज, चालणें, बोलणें, कामकाज यांत पावलोपावलीं ती दुसऱ्याचें मन आकर्षूनं घेणारा लोहचुंबक आहे. तिला पहातांच जशी मधमाशी मोहळाला लुब्ध होते तसेंच पुरुषमात्र इला लुब्ध होऊन भुलून जातात, यांत स्त्रियांचा काय दोष बरें ?

एक मोठा हांडा मोहरांनी भरून त्याचेजवळ एक स्त्री उभी करून कोणी एक महान साधु ब्रह्मचारा आणून त्याला विचारा कीं, ''बुवासाहेब, या दोहोंतून जें आवडेल तें घ्या.'' तर साधुमहाराज, तो सुवर्णाचा हांडा टाकून, या सुवर्णकांतीकडेच हात करतात कीं नाहीं हें पहा.

सातवें, दुर्गुणांचें उत्पत्तिस्थान; - तर दुर्गुणांची उत्पत्ति आधीं आपलेपासूनच झाली. प्रथम स्वधर्म सोडून मन मानेल तसें वर्तन करणें, दारु पिऊन रस्त्यांत लोळणें, पोऱ्यांचे तमाशे पाहात फिरणें, जुवा खेळणें, गांजा वगैरे ओढणें, रांडा ठेवणें, इत्यादि वाईट व घाणेरडीं आचरणें तुम्हीं करूं लागला. आतां रांडा कोण ? यांची कांही सृष्टिविरहित उत्पत्ति झाली का ? का ह्या कोणी दुसऱ्यां देवानें केल्या ? रांडा या तुम्हींच फसवून घराबाहेर काढलेल्या स्त्रियांपैकी स्त्रिया असतात. कोणतीही स्त्री कशीही असो, तिला तिचे घरांत किती जरी जिवासांड जाच असला तरी ती कोठें आड विंहीर करून प्राण देईल; पण बिन-आधारी कोठेंच राहूं शकणार नाहीं. कशी धैर्यवान असूं द्या; एकटी कोणाचा जरासा आसरा असल्यावांचून ती घराचे अंगणांत उभी राहाणार नाहीं. कारण निरंतर एकाच घरांत कडक जप्तींत कोंडून राहिल्यामुळें तिच्याच्यानें बाहेर पाय टाकवणांर नाहीं. कशीही मोठी ढालगज बेशरम असूं द्या, ती होऊन कधींही परपुरुषाचे गळ्यांत पडणार नाहीं. प्रथम तिला तुह्मी आपला थोडासा दुर्गुण दाखवून एकदा सृष्टीचा वारा दाखविलात, ह्मणजे पुरे. मग तिला पुढें दुर्गुण शिकविण्याकरितां पंतोजी नको; कारण कोणी एखादा मनुष्य दारु अगर अफू विकण्याचा व्यापार करूं लागला, ह्मणजे त्याला त्या अस्सल मालांत काय घालावें, यांत कोणता पदार्थ मिसळून हा माल ज्यास्त करावा, याचे गिऱ्हाईक कोण, त्या गिऱ्हाईकाची मर्जी खुष राखून आपला माल खपविणें वगैरे गोष्टी तो सहजीं शिकतो, ह्मणून तो का पूर्वीचा दारुविक्याच असतो ? कोणीही स्त्री अगर पुरुष ज्या मार्गांत अथवा व्यापारांत पडतो तो देखत देखत शिकतां शिकतां त्यांत अगदीं हुशार निपुण होतो. जसा जिनसेचा अगर कोणत्याही मालाचा खप ज्यास्ती होऊं लागला, ह्मणजे तो माल तयार करण्याकरितां जो तो झटतो, पण त्याच मालाला जर कोणी फुकट न पुसते तर तो माल कोणच तयार न करते, तसें तुम्ही रांडाकडे न जाता त्यांना लग्नकार्यांत दलशे पानसुपारी वगैरे प्रसंगी व एऱ्हवी गम्मतीकरितां शेंकडों रुपये देऊन मोठया आदरानें चाहून न आणतां त्यांच्याकडे अगदीं न पाहातां, तर हा इतका फैलाव झाला असता का ? हा सारा तुमचा प्रताप. घराबाहेर निघून आपले कसें होईल, कसें चालेल, अशी जर त्यांना भीति असती तर त्या घराबाहेर कधीं पाय टाकत्या ? पण आतां त्यांना पक्कें ठाऊक आहे कीं आपण कसें तरी पोट भरूच भरू. यामुळें हे सर्व प्रकार वाढत गेले. रांडांची कांहीं खाण नाहीं. स्त्रियांना तुम्ही प्रथम गोड गोड बोलून, नादीं लावून, एकदा घराबाहेर घराचा उंबरा पारखा करून काढले, म्हणजे जोंवर तारुण्याचा भर असतो तोंवर कसे तरी ढकलून नेतां, नी मग तिचें नशीब तिचेबरोबर देऊन तिला सर्वस्वी नागवून सोडिता; तेव्हां ती हा निंद्य व्यापार अगदीं उघडपणें हवा तसा करून आपलेसारखी दुसरीस करूं पहाते. हें तुम्ही आपल्यावरून पहा. आपल्यासारखें सारें जगत्रय आहे असें ज्याचें त्याचें मनावरून त्याला वाटतें. चोराच्या नजरेंत सारेच चोर, लबाडाला

लबाड, शिंदळास सारेच शिंदळ दिसतात. याच्या उलट जे परोपकारी, धर्मशील, सत्यवादी, दयाळू, निष्कपटी, क्षमाशील आहेत त्यांना तसेंच दिसतें.

जेव्हां पांडवाचे घरीं हस्तनापुरास राजसुययज्ञ झाला, तेव्हां दुर्योधनास श्रीकृष्ण महाराजानीं आज्ञा केली कीं, या सर्व ऋषिमंडळांतून कोणी तरी महान श्रेष्ठ अगदीं उत्तम, माझे हातून दान घेण्यास योग्य, असा निवडून आण. तेव्हां दुर्योधन त्या मंडळींत फिरूं लागला. त्याच्या नजरेंत सारे ऋषिजन कोणीएक अधमाधमांचीच सभा असें भासून त्यानें देवाजवळ येऊन सांगितलें कीं, ''देवा, यांत आपले हातून दान घेण्यास योग्य एकदेखील सांपडत नाहीं, सारे गाढविचे ढोंगी आहेत.'' हा त्याचा निरोप ऐकून तीच आज्ञा राजा धर्मास केली. तेही सर्व मंडळींत फिरून आले, तेव्हां देवानीं विचारलें, 'का धर्मराज, कसें काय आहे ? दान घेण्यास कोणी योग्य आहे का नाही ?' ते वेळेस धर्मराज हात जोडून म्हणाले, 'देवा, हें सारे ऋषिमंडळ सूर्यासारखें तेजस्वी, अग्नीसारखें शुचिर्भूत प्रखर दिसतें. तेव्हां यांतून मी कशी निवड करूं. माझ्या नजरेंत तर सर्वच पूज्यमान आहेत.' तर हें असें आहे.

त्यांतून स्त्रिया आधींच आगीचा लोळ, त्यावर तेल, मग उजेडाला काय कमी ? एक मशाल तर दहा दिवटे तिच्याभोंवती जमावयाचेच, प्रथम त्यांना कसकसें भुलवून पुढची आशा दाखवून कशा कशा युक्तीनें बाहेर काढल्यात. हें खरें वर्तमान एकीलाच पुसा, म्हणजे मग पहा कशी ती वाघिणीसारखी चौताळून तुमच्या नांवानें करकरा दांत खाईल. तर दुर्गुणापासून दुर्गुण उत्पन्न होतो. याचे कांही कोठें शेतमळे नाहींत. तुम्हीच स्वतः अनेक दुर्गुणांनीं कडू वृंदावनाचे वेलासारखे लगटलेल असून स्त्रियांवरच ढकलतां ही तुमची मोठी कुशलता आहे.

एकदा दुर्गुणाचा वारा लागला म्हणजे कोणतेंही साहस पुरुष किंवा स्त्री करतेच. एक चोरी केली कीं छपविणकरितां लबाडी, लबाडीचें सत्व राखण्याकरितां अनेक सांहस कर्मे करणें भाग होतेंच. याकरितां तुम्हींच जर यांचेकडे वर डोळा करून न पाहिलें तर सर्वच मिटतें की नाही. आतां या तोडीचे स्त्रियांचे दुर्गुण दाखवा. स्त्रिया कधीं रस्त्यांत तमाशे पहात, दारु पिऊन रस्त्यानें लोळत, जुवेबाजांत, पांचशें लुटारू बायकांची टोळी जींत एक नाही तर दोन पुरुष अशी तरी पाहिल्यात का ? मदतखान्यांत, अगर भीतिविरहित एखाद्या पुरुषाचे घरीं विलासांत गर्क होऊन राहिलेल्या त्या दृष्टीस पडतात का ? कसबिणी वेगळ्या करा, त्यांची गोष्ट निराळी, त्यांचा तो एक व्यापारच झाला, त्यांना इकडे लावूंच नका, त्या यजमानाचे मर्जीप्रमाणें न वागल्या तर उद्यां उपाशी मरतील.

'स्त्रीचरित्र' या नांवाचे पुस्तकांत स्त्रियांचें साहस कोणी एका भाग्यशाली पुरुषानें वर्णिलें आहे. पण त्या साऱ्या गोष्टी किती खऱ्या आहेत ? याला प्रमाण बारीक विचारानें पाहूं गेलें असतां कोठेंच मिळत नाहीं. राजांच्या मुली अगर राण्या ह्या किती बदोबस्तांत कडक पहाऱ्यांत असतात बरें ? तेव्हां रात्रीच वेळेस पुरुषाचा पोषाख करून जनानखान्याबाहेर जाणें किती मुष्कील ? एक राजा वेगळा करून आंत वाड्यांत पुरुषजातीचें कुत्रेंसुध्दां जाण्याची बंदी, एकापासून तों पन्नास दरवाजांवर कडक कडव्या शिपायांच्या चौक्या. तेव्हां ते सारे शिपाई का आंधळे होते ? का त्यांच्या डोळ्याला अंधेऱ्या लावीत असतील ? एका दोघांला द्रव्याच्या गुळण्या देऊन तोंड बंद करतील. पण बाकीचे सारे निमकहराम ? कोणीच त्यांना हटकीत नसेल का ?

अरें, ज्यांना त्या राजवाड्याबाहेरील ऊन्हे देखील ठाऊक नाहीं; सदा कोंडलेल्या, परपुरुषाचें तोंड कधीं जन्मात पाहिलें नाहीं, त्या तें सर्व ऐश्वर्य सोडून कोणी गोसाव्याकरितां, कोणी खासदारकरितां, येवढें धाडस करून जातील ? छे असें कधींच होणार नाहीं.

राजहंस नित्य मोत्याचा चारा खाणारे, त्यांना सहा महिने निरशन पडलें ह्मणून ते का विष्टा भक्षण करतील ? कसबिणी, कीं ज्या आतां कसब हा एक त्यांचा रोजगारच असें समजून फक्त द्रव्यावर नजर देतात, मनुष्यावर देत नाहींत, त्यादेखील खासदाराला अगर एखाद्या विद्रुप जोगड्याला जोड्याजवळ उभे करणार नाहींत, मग या तर राण्या, सदा विलाशी, त्या स्त्रीचरित्रांत एक एक गोष्ट अशी विभत्स व वाईट लिहिली आहे कीं, वाचणाराणास लाज वाटते. यावरून तो पुस्तककर्ता किती शहाणा स्वदेशहितेच्छु आहे हें सहज ज्यांनीं तें पुस्तक वाचिले असेल, त्यांच्या त्यांच्या लक्षांत येईल.

या राज्यांत विद्येयें प्राबल्य व छापखाने झाल्यामुळें मंजुघोषा, मुक्तमाला, (यथा) मनोरमानाटक असे बरेच लहान लहान ग्रंथ तयार झाले आहेत. प्रत्येक गोष्टींत, पुस्तकांत शृंगार, विनोद, शोक, हे तीन गुण असल्यावांचून रस भरत नाहीं, हें खरें, पण ग्रंथकर्त्यांनीं आपण जें कांहीं लिहितों हें घडण्यासारखें किंवा पूर्वी कधींकाळीं असें घडून आलें होतें किंवा नाहीं याचा आधीं विचार करून मग पुढें ग्रंथ रचावा.

प्रथम मंजुघोषा ही सार्वभौम राजाची अति लाडकी कन्या, ती त्या वसंत माधवाबरोबर कांहींच विचार न करितां एकदम विमानारूढ होऊन ह्मातार्‍या बापाचे हातावर तुरी देऊन जाईल का ? ज्या बापानें तिला लहानपणापासून लाडानें कंठांतील कंठ्याप्रमाणें वागविलें, त्याविषयीं तिचे मनांत कांहींच आलें नसेल काय ? ती तर मोठी शहाणी सर्व

गुणसंपन्न अशी असून या राजपुत्राचें नाव गांव यांचा तपास न करतां एकदम तो रत्नखचित महाल व ते सर्व मनोरम उपभोग टाकून निघून गेली असेल का ? जातेवेळेस त्या म्हाताऱ्या बापाची मूर्ति तिचे नजरेसमोर उभी राहिली नसेल का ? तिला कांहींच वाटलें नसेल का ? तेव्हां वाचकहो, ही गोष्ट किती खरी आहे, हें तुम्हीच पहा बरें. असो, आज द्वापारयुग जाऊन कलियुग लागल्यास हजारों हजार वर्षे होत आलीं. त्यांत आज इंग्रजसरकारचें राज्य झाल्यासही कमींत कमी दोन आडीचशें वर्षे होत आलीं. हे ग्रंथकर्तेही याच चालू शतकांतच जन्मले असतील. तेव्हां त्यांच्या व माझ्या आज दहा पिढ्या पूर्वींच्या पूर्वजांनीदेखील असें वसंतमाधवाचे विमानासारखें विमान पाहिले नसेल.

इंग्लीश लोकांनीं पुष्कळ यंत्रेतंत्रें केली, आगगाडी केलीं, व विमानही केलें. पण त्या विमानाचा मनास वाटेल तसा उपयोग करून घेण्याची युक्ति त्यांनादेखील अजून साधली नाहीं. मग ते वसंतमाधवास प्रसन्न होऊन मंजुघोषेस पळवून नेण्याकिरतांच कामीं पडलें असेल हें किती बरें अघटित आहे.

दुसरें, मुक्तमालाही (यथा) मोठ्या कुलवंत सरदाराची मुलगी. तिचा पति राजाचे खपगीमुळें कारागृहांत पडला होता तेव्हां त्याच्या भेटीच्या खटपटींत असतां एका दुष्ट भद्राक्ष या नावाच्या अम्मलदाराचे सपाट्यांत सांपडून त्यानें तिचें अतिशय हालवनवास करून शेवटीं एका निबीड अरण्यांत ठेविलें तरी तिनें स्त्रीधर्म सोडला नाहीं. हें ग्रथकर्त्यांनी दर्शविलें. हें झालें यांचें. पण याचे उलट ह्मणणे इतकेंच कीं, पुरुषाच्या शक्तीपुढें स्त्री केवळ मुंगीप्रमाणें निर्बल आहे. त्याचा एक हात व इचें सर्व शरीर बरोबर आहे. अगदीं एखाद्या निवांत ठिकाणीं, चिरेबंदी कोटांत जर असा एखादा कामांध व्याघ्र गायीमागें लागला तर तो तिचे प्राण घेतल्यावाचून राहील का ?

अरे, तुमचे देवदेखील दगेबाज; मग तुह्मी असालच असाल, यांत नवल काय ? इंद्रानें गौतमाचे रूपानें जाऊन आहिल्यासारखे साध्विला कलंक लाविला. चंद्रावळ महापतिव्रता होती, तेथें कृष्णमहाराजानीं राहीरूपानें तिचे वृताचा भंग केला कीं नाहीं ? असें जर कपट करून तुम्ही घर बुडवूं लागला तर तेथें पतिव्रता धर्म का रडेल ?

कृष्णमहाराज तरी देव, त्यांच्या हातीं पापपुण्याचा ताजवा तरी आहे. तो सर्वांतरसाक्षी आत्माराम, खरें खोटें जाणणारा आहे. तर त्यालाच दया येऊन अशा प्रसंगी तुमच्या हातापायाचे रति रति तुकडे करून स्त्रियांना फाशांतून सोडवील, तरच सुटका, येऱ्हवीं तिची बिशाद नाहीं. या सर्व गोष्टी बुकांतच खऱ्या. पुराणीकबुवा पुराण सांगतेवेळीं वांगी निषिध्द, कधीं खाऊं नये म्हणून सर्व श्रोतेमंडळीला ओरडून ओरडून सांगतात. पण एकदा

पुराणीकाची स्वारी व्यासपिठावरून उठली म्हणजे मग पुराणांतलीं वांगीं पुराणांत ठेवून घरीं आली म्हणजे स्वतः पासरीभर वांगी मिटक्या मारमारून स्वाहा करिते. तर हें ज्ञान सांगण्यालाच केलें ? तसा आज चालतो कोण ? तिच्या वृत्ताकडे कोण पहातो ? एक ती ते वेळेस डोकें अपटून दुष्टाच्या पायावर प्राण सोडील तरच सुटेल, नाहीं तर बोलवायलाच नको. तेव्हां या अशा गोष्टी लिहिणें म्हणजे काय ? कीं एखाद्या लहान मुलाला समजाविणें आहे. नित्य क्रमावरून हें किती खोटें आहे हें सहज लक्षांत येतें. तसेंच मनोरमा नाटकांत नाटककर्त्यांनीं चार प्रकारचा प्रयोग केला आहे.

पहिला प्रयोग – मनोरमा व गणपतराव हे उभयता सुशिल सुशिक्षित असल्यामुळें त्यांचा शेवट चांगला झाला. दुसरें, गोदूबाई व रामराव फडणीस हें जोडपें अगदीं विजोड असून तरण्या बायका म्हाताऱ्या नवऱ्याची कशी हेळसांड करतात, त्याला किती तुच्छ मानतात, हें दाखविलें आहे. पुढें रामरावाच्यामागें गोदूबाईनें गुण उधळिले. त्यामुळें तिची भर कोडतांत फजिती, फौजदाराची काम करण्याची शैली, सरस्वतीबाई व तुक्या न्हावी यांची जवानी, वगैऱ्यांचीं वर्णनें आलीं आहेत. तिसरें, हीनवर असल्यामुळे विनायकरावाची बायको गंगू, सरस्वतीबाईच्या द्वारें लुच्च्यांच्या नादीं लागून कराचीस पळून जाऊन उघड कसबीण बनली, कसबीणीची ममता, त्यांचे आर्जव, गोड बोलणें, शपथा – आणांत किती खरेपणा असतो हें व शेवटीं त्यांचे परिणाम कसे होतात हें सांगितलें आहे.

चौथे, रामभटजीची सून ठकू ही विधवा असून गर्भवती झाल्यावर सर्व सोहाळे होऊन मुंबईस बाटलीवाल्याचे इस्पितळांत संयोगजन्य दुःखानें अतिशय दुर्दशेंत मरण पावली.

हे इतके प्रकार सिध्द करून दाखविले खरे. पण नाटक रचून नाटककर्त्यांनीं आपली नाडी हातानें उघडी करून सर्व अंतरदशा लोकांस प्रसिध्द करून उपहास मात्र करून घेतला. ‘ झाकली मूठ सव्वा लाखाची ‘. घरोघरी मातीच्या चुली, घरोघरी अंधार-उजेड हें आहेच. सगळ्याच्यांच घरीं कोणाची बहीण, आई, सून, लेक विधवा असेलच की नाहीं ? तर एकीला बट्टा लागला म्हणजे सरसकट सगळ्याच त्यांत आल्या कीं नाहीं ? तेव्हां यांत काय सार्थक झालें ? या ग्रंथावरून पुढें असेंच मनोरमेसारखें सर्व स्त्रियांचें दैव खुलून मनाजोगे पती पाहून आईबाप तेथेंच देतील आणि असें सर्वच प्रसंगांत घडेलच घडेल, हें कोणीं पाहिलें आहे.

रामरावासारखे ह्मातारपणीं लग्न करून गोदुसारखी प्रतापी बायको मिळाली, तर आपलेमागें आपल्या नांवलौकिकाचा भर कचेरींत लिलांव फरील ह्मणून ह्मातारपणीं लग्न करणार नाहींत, हें असें कधीं होणार नाहीं. ह्मातारपणीं लग्न करतील, मग त्यांच्यामागें उघड ह्मणा किंवा झाकून ह्मणा त्याचा फजिता होणारच होणार, यांत अंदेशा नको. तसेंच हीनवर

म्हणून स्त्रिया निघूनच जातील हेंही अशक्यच आहे. कारण आज अशाच निघनिघूं जात्या, तर हे सर्व जग या ऊनाड बायकांनीं भरून गेलें असतें.

आतां ठकू ही इस्पितळांत मेली हें कांहीं मोठे नवलकारक झालें नाहीं, घरी जी मरायाची ती तेथें मेली. तेव्हां या सर्व गोष्टींचे परिणामावरून सर्व स्त्रीपुरुषांस दहशत बसून ते पुनः असें कधीं करणार नाहींत, हे ग्रंथकर्तेराव, तुम्ही स्वप्नांतसुध्दां आणूं नका.

असो, सर्व दुर्गुणाचे पुतळे तुम्हीच आहांत. बाबा, स्त्रियांना काय म्हणतां ? त्यांतूनही पेशव्यांचे आनंदीबाईकाकुसारख्या किंवा आणखी दुसरे प्रकारचीं अघोर साहस कृत्यें करणाऱ्या पुरुषापेक्षां स्त्रिया फारच थोड्या विरळगत सांपडतील. परंतु विजयालक्ष्मीचे थाटाच्या सर्व स्त्रिया गोळा केल्या असतांही शंभरांत दहा सांपडणें कठीण !

तरी या अघोर साहस कृत्यांतही थोरपणा स्त्रीजातीकडेच येतो. तुम्ही प्रथम तिचें मन नाना प्रकारानें मोह्वून एकदा मनमोहन बनलात, म्हणजे ती तर तुम्हांवर अगदीं भरंवसा ठेवून अंतःकरणापासून प्रीति करू तिचें या जगांतलें अमोल्य रत्न एक स्त्रीधर्म सोडून तुम्हीच होता, व तुह्माला ती आपला जीव आर्पण करते. तिला तुमची दगाबाजी तेव्हांच कशी समजेल ? ते वेळेस तर तुम्ही तिचें पुढें केवळ एखाद्या गुलामाप्रमाणें वागून तिची मर्जी राखितां, जोडे तोंडांत धरून पुढें पुढें करतां. अतोनात प्रीति कोठपर्यंत ? तुमचे मनोरथ पुरे होईपर्यंतच. एकदा तुमची ही दुष्ट वासना पुरी होऊन ती गर्भवती झाली म्हणजे मग त्या यातना, ती काळजी, तिचेकडेस सोपवून विंचवासारखे ढेकळाआड तोंडें लपवीत फिरतां, तेव्हां मग ती त्या ओझ्याखाली मर्णोन्मुख झालेली दीनवदनीं हरणी त्या व्याघ्ररूपी मानवाधमास, ‘ आतां कसें करावें हो ’ असें जर म्हणाली, तर या दुष्टाचें तोंडांतून जसा कांहीं सावच बोलतो, असे शब्द बाहेर पडावयाचे, ‘ आतां आम्ही काय करावें, तूं केलेंस तें भोग.’ मग हा जबाब ! ज्या मुखांतून अति कोमळ प्रीतीचे शब्द निघत होते, ज्या मुखाला ती चंद्राप्रमाणें न्याहाळीत होती, आपला देहप्राण ज्यावरून ओवाळून टाकीत होती, ज्यावर अगदीं अंतःकरणापासून प्रीति करीत होती, त्याच मुखांतून हे काळजास बाण बसणारे शब्द जेव्हां तिचे कानीं पडत असतील तेव्हां तिची दशा कशी होत असेल ? तिला ते वेळेस कसें वाटत असेल ? पण बिचारी करते काय ? शेवटी नाइलाज होऊन आपली अब्रू बचावण्याकरितां पोटच गोळ्याचासुध्दां त्याग करून केलेंल्या कर्माचें प्रायश्चीत भोगिते. येथें काय पडलें इंग्रज सरकारचें राज्य ! साक्षीवांचून पान हालणें नाहीं. पण अशा नाजूक कामांत साक्ष मिळणें नाहीच. यांत सरकारदेखील अन्यायाचे दोषास पात्र होतें. कारण जशी लांच घेणारास एकपट व देणारास दुप्पट शिक्षा लागू केली आहे ; त्याचप्रमाणें या कामांतदेखील त्यांनीं सक्त कायदा करावा कीं, स्त्रियांना एकपट ; तर पुरुषाला दुप्पट सक्तीची शिक्षा होत

जाईल असें कां असूं नये ? पूर्वीचे रोमन, ग्रीक वगैरे लोकांत या कामास फारच मोठी जबर शिक्षा देत असत. तर इकडे सरकार लक्ष देऊन पुरुषांचीं तोंडें फारच लुबूलुबू करितात, तर त्या तोंडावर चांगले मोठाले डाग देण्याची शिक्षा ठरवील, तर पुरुष जातीत ही जबर दहशत बसून पुढें असें एकदेखील उदाहरण आढळून येणार नाहीं. असो, पुढें ती बिचारी गाय होऊन हाय हाय करीत, धाय धाय रडून आपल्या नेत्रोदकानें तो कलंक धूत, कारागृहांत अगर आणखी कोठें तरी लज्जेचें गांठोडें डोक्यावर घेऊन जनापवाद सोशीत जन्म घालविते ! कित्येक प्राण देतात ? कित्येक सर्व आप्त धनदौलत सोडून देशोधडीस जातात ! तुमच्यापेक्षां सर्प बरा, तो डसल्याबरोबर प्राण तरी जातो. पण तुमचेजवळ जे विष आहे तें नित्य नित्य शरिरास असह्य दुःख देऊन प्राण घेतें. असे तुम्ही सर्पापेक्षां घातकी आहांत, तर आतां थोर मनाचें कोण ? तुमचे पायीं स्त्रिया दुःख भोगितात तसें तुम्ही त्यांचेकरितां भोगाल का ?

अरे, तुमचे हातून इतकी दया, परोपकार कधींच होणार नाहीं. आज एकीची दुर्दशा करून तिला देशोधडी केली कीं लागता दुसरीचें मागें. पहिलीची स्वप्नींसुध्दां आठवण येणार नाहीं. परंतु स्त्रियांची प्रीति केवळ समुद्रासारखी खोल आहे. ती ज्यावर फिदा होईल त्याला प्राणापलीकडे ठेवील. तिचा किती जरी त्यानें वनवास केला, तरी तो त्याचाच पक्ष धरील. असो, स्त्रियांचें ह्रदय अति कोमल प्रीतिनें भरलेलें आहे.

स्त्रियांचे पायीं दुर्दशा होऊन देशोधडीस लागलेले पुरुष फार थोडे सांपडतील ; पण स्त्रिया किती सांपडतील हें सांगवत नाहीं. अरे तुम्ही आट्टल शहाणे, महाठक, इंद्रायणीचे गोटे, जसें हाटलें तसेंच बखल बसणार, उसाचे शेतांतून जाल पण अंगास पान लागूं देणार नाहीं. रोज मोठमोठ्या सभा भरविता, काय काय चाळे करता, व्याख्यानें देता, दुसऱ्याला सांगता, पण स्वतः तेच पढत मूर्ख. दिवा दुसऱ्या उजेड देतो, पण त्याचे खाली अंधार. तसे तुम्हाला जर तुमचे दुर्गुण कळून येते, तर छाती फुटून मरता.

अरे, तुमच्या अंगीं अंगचें ज्ञानपेक्षां चार ठिकाणीं हिंडून फिरून अनेक ग्रंथ आवलोकून गोळा केलेंडर ज्ञानाचा भरणा फार असल्यामुळें पाहिजे त्या रुपानीं कोणत्याही संकटांतून पार पडणें, म्हणजे हातचा मळ. पण या दुर्दैवी आबला, सदा गृहवासांत. चुलीपासून तों दाराचे उंबऱ्यापर्यंत काय तें ज्ञान. शिवाय तुमच्यासारखे सडे लांकडांचे खुंट नाहींत. त्यांचेमागें देवानें सारें लाढणें बांधल्यामुळें त्या लवकर फसतात. आतां दुर्गुणी कोण ?

आठवें, स्वर्गमार्गाचा नाश करणारें यमनगराचें व्दारच, अशी ज्यांना तुम्ही संबोधनें देता त्या स्त्रिया कोण बरें ? तुम्हीं जन्म कोणाच्या पोटीं घेतलात ? तुमचें नऊ महिने

जिवासांड ओझें कोणीं वागविलें ? नेत्राचा दिवाली व तळहाताचा पाळणा करून कोणत्या साध्वीनें तुम्हाला रजाचा गज करून दाखविलें ? तुम्हाला प्राणपेक्षां कोण जपलें, त्या तुमच्या आयाच ना ? ज्या तुमच्या कल्याणकडे वारंवार पहातात, ज्यांना तुमचें मोठें भूषण वाटतें, व निरंतर तुम्हाला भाऊ दादा अशा मोठ्या प्रेमानें हाका मारतात. त्या कोण तुमच्या बहिणी ना ? ज्या तुमच्या सुखदुःखाच्या वाटेकरणी, तुमच्या या संसारदरबारांतल्या मुख्य प्रधान, तुमच्यावर मनोभावापासून प्रीति करणारणी, त्या तुमच्या बायका ना ? त्याही तरी स्त्रियाच आहेत ना ? का ह्या वेगळ्या करून आणखी दुसरी स्त्रीजाति आहे ? स्त्रिया म्हटल्या म्हणजे साऱ्याच, तेव्हां तुम्ही जें हें त्यांना काय कुऱ्हाड, काय सर्व कपटाचें पात्रच, दुर्गुणाची पेंठच, स्वर्गमार्ग नाश करणारी अशीं अशीं जीं संबोधनें देता, त्यावरून तुम्हाला काय म्हणावें ? संन्यास घेतला तरी मातेची आज्ञा मानावी, तिला वंदावें, मुलांना मातापिता व गुरू या वेगळें दुसरें दैवतच नाहीं. पहा, पुंडलिकानीं आईबापाची सेवा कशी केली कीं, प्रत्यक्ष देवदेखील त्याची भक्ति पाहून त्या स्थळीं अजून उभे राहिलेत कीं नाहीं ? पण आतां तुमची मातृभक्ति पाहून देवानीं इतकें सत्व सांडले कीं, प्रत्यक्ष त्यांचा पायदेखील एका मातृभक्तानें मोडला, तरी ते त्याला कांहींच देवपणाचा चमत्कार न दाखवितां उगीच बसले, देवाचे अंगी चमत्कार दाखविण्यापुरतें सामर्थ्य नव्हतें असें नाहीं, पण असे जे मातृद्रोही, ते चांडाळ ; त्यांना शिवूं नये, त्यांचे तोंड पाहूं नये, जर त्याचा स्पर्श झालाच तर सचैल स्नान करावें ; तर अशा चांडाळास कांहीं देवपणाची प्रचिती दाखविली, तर आपल्या देवपणास विटाळ होईल. शिवाय हे असे आधमाधम आहेत यांना परभारे यमराजाचेच हातून शासन योग्य असें जाणून देवानेंदेखील गम घेतला. बिरबलास बादशहानें प्रश्न केला कीं, हे बिरबल, देव कोठें आहे, कोठें राहातो, खातो काय ? तेव्हां बिरबलानीं उत्तर दिलें कीं, सरकार देव जवळच आहे ; ज्याचें इमान कायम आहे त्याज जवळ राहतो ; व गम खातो. ह्मणजे काय कीं गंभीरपणानें तो सर्व जगाचे अपराध क्षमा करतो. नाहीं तर देव जर असें नित्य लहान मोठ्या अपराधाची शिक्षा देते तर मग काय ? येथून रोज कोट्यावधी तुमचे बंधु, कोणी वकील, कोणी न्यायाधीश, जेलर, शिपाई, इन्स्पेक्टर, असे रोज साक्षीदारसुध्दां नेऊन हे खटले तोडतां तोडतां देवांनादेखील राधा-चंद्रावळी गोकुळांतील सासुरवासनी गोपिकांबरोबर घटकाभरसुध्दां बोलण्यास, रास वगैरे करण्यास फुरसत झाली नसती. का खरें ना ? असो.

आतां तुमच्या आईला कोणी, ती फलाणें मामासाहेबाची आई कीं नाहीं, नर्कदुर्गाची वेसच आहे, ते अमके तिमाजी बोबडे याची बहीण केवळ कपटाची खाणच आहे. ते गोमाजीपंत कापरे, त्याची बायको तर केवळ पुण्यवृक्ष तोडण्याची कुऱ्हाडच आहे, असें जर म्हटलें तर तुम्हाला बरें वाटेल काय ? तुम्ही त्याचे हे असे अपशब्द सोसून उगीच बसाल ? अरे, तर मुर्खांनो, स्वर्ग तुमच्या बापदादानेंदेखील पाहिला नसेल. तो तुम्हाला कोठून

मिळणार ? एक स्त्रियांचे पायीं त्यांचे नादीं लागल्यानें जर स्वर्गवास प्राइज़ न होता तर फार बरें होतें, पण तसें कोठें आहे ? तुम्ही जें जें कांहीं वाईट आचरण करतां तें तें सारेंच स्त्रियाकरितांच, असें जर असतें तर मग खरें. त्यांच्याच माथीं सर्व दोष दिला असता. पण तसें कांहीच नाहीं. अरे, तुम्ही तर जीव जाईसतोंपर्यंत स्त्रीमुख न्याहाळाल तरी तुमची इच्छा पुरी न होता तसें अतृप्तच मराल, फक्त एका दोषाकरितां सगळेंच. सब घोडे बारा टक्के बरोबर अहारे, धन्य तुमची.

नववें, सर्वर कपट-लिलायुक्त पात्र, तुम्ही कपटयुक्त लिला पात्रें नांहींत का ? अरे गृहस्थांनो, तुमच्यासारखीं कपटपात्रें तर या पृथ्वी-तलांत सांपडणार नाहींत. स्त्री तुम्हावर प्राणापेक्षां प्रीति करतेच यांत आंदेशा नकोच. कारण स्त्रियेचें मन एकदां एके ठिकाणीं बसलें म्हणजे तो वज्रलेप. अरे, तुम्ही भ्रमर, या फुलावरून त्या फुलावर उडत फिराल. पण स्त्रीजाति तशी नाहीं, हें आजमावून पहा.

अशी ही स्त्री तुम्हावर सदा मनाधर्मापासून प्रीति करीत असतांही तुम्ही दुसरीवर नजर ठेवत, तिसरीबरोबर यथेच्छ मनमानेल तसा व्यवहार करता, मौजा मारता व चवथीचें चिंतन करता. इतकें तुमचें मन चंचल आहे, तरी स्त्रीचरित्र व पुरुषाचें भाग्य ब्रम्हदेवास कळत नाहीं, असें म्हणतां हें कसें ? अरे, पुरुष करंटे किंवा दैवशाली होणार, हे देवानें उपजतांच त्यांचे प्रालब्धीं लिहिलें तेथें ब्रह्मदेव कोण ? कुभार मडकें घडणार. बरेंवाईटाचा शिक्का नारायणाचे स्वाधीन. तरी एकदां जें ललाट-पटावर अक्षर पडलें तें दवाच्यानेंदेखील फिरणार नाही. त्यांत तुम्ही हा सिध्दांत ठरविणार कोण ?

पांडव येवढे देवाचे प्राणसखे होते. मग अज्ञातवासांत विराटाचे घरीं कां चुलपोतेरें करीत बसले ? आर्जुनानीं शंकारालादेखील युध्दांत हारिस आणिलें, प्रतिइंद्रच ! पण मग राणींवसांत बृहन्नडा होऊन पोरीबरोबर नाचूं लागले ! असेंच स्त्रीचरित्र. तरी स्त्री अशी तुमच्यासारखी एकाला हात व दुसऱ्याला लाथ देणार नाहीं. ती एकच धरील खरें ; पण तें तिच्या मनासारखें मात्र पाहिजे. मनासारखें नसलें तर उगीच कशी जरी भूक लागली, तरी काट्या भरणार नाहीं. अरे, पण तुम्ही वेळ पडली तर अगदीं कुरूप घुबडसुध्दां सोडणार नाहींत. त्या वेळेस ती तुम्हाला देवांगना, रंभाच वाटेल. असे तुम्ही गाजरपारखे, बैमान, मित्रद्रोही, राजद्रोही जी जी उपमा द्यावी ती ती कशी तुम्हाला ठीक खासी साजती.

अरे, जो मित्र तुम्हांशीं उघडपणें निष्कपटानें वागतो, त्याच्या तोंडावर गोड गोड बोलून, त्याच्या काळजाचा तर केवळ घडच, त्याच्या घरची प्रत्यक्ष लक्ष्मीच, त्याच्या अब्रूची रक्षण करणारी केवळ तरवारच, त्याच्या सर्व सुखादुःखाची वांटेकरीणच, त्याच्या सर्व

ऐश्वर्याची स्वामीणीच, त्याच्या ह्रदयपुष्पवाटीकेंतील मधूर केतकीच, त्याची ईश्वरी फलप्रसादानें लवलेली कोंवळी डाळिंबीच, अशी त्याची प्राणसांगातीण मनोरमा ; ती हर प्रकारानें हिसकून घेऊन त्याला सदैव तुम्ही उघडे करण्यास पाहता. कोणाला जहागिरीवरून राज्यपदावरून देखील खालीं ओढावयास मागें पुढें पाहात नसतांही स्त्रियांलाच कपटयुक्त लिलापात्रें ह्मणतां. शाबासरे ठकांनो ! स्त्रियेच्या नादी लागल्यानें जमीनदोस्त झालेला एक तरी पुरुष दाखवा बरें ?

आतां तुम्ही म्हणाल कीं, स्त्रियांच्या पायीं मोठमोठे अनर्थ नाहीं का झाले ? हो झाले, व नित्य होतात. नाहीं कोण म्हणतें ? पण त्यांत त्यानीं काय केलें. अरे, तुम्ही रोज जहागिरी, वतन, देशमुखी, यकश्चित् पाटिलकीकरितां देखील एकमेकांचे प्राण घेतां, विष घालीतां, हेही स्त्रियांचे पायींच होतें का ? हे अनर्थ नाहींत ? एखादा खटला सरकारांत चालत असला म्हणजे लक्षावधी रुपये खर्चितां, तीन टिकल्याचा शिपाई त्याच्या देखील पाया पडतां ; मग हें कोणाकरतां ? तुम्ही आपल्या टेकीकरितां मरता का पातकाकरितां मरतां ?

हे असे अनर्थ दुसरे कशाकरितां न होऊन फक्त स्त्रियाच जर याला कारणभूत असत्या, तर मग त्या खराखर दोषी ठरत्या. स्त्रियांचे पायीं जीव तर काय, पण हा सारा जन्म अर्पण करणें हा तुमचा देहधर्मच आहे. अरे, देवासारख्यांनी स्त्रियांची खुशामत केली ; तेथें तुम्ही कोण ? कोण्या झाडाचा पाला ? सर्वांत वरचस्व स्त्रीचेंच. कारण सगळें तिचे स्वाधीन. तिचेकरितां सारें वैभव. अरे, स्त्रिया जर नसत्या तर झाडाची पानें चावीत रानारान भटकत फिरला असता. मग असें रोज पंचामृत पुढें आलें असतेंच !

देवानें मुळींच स्त्रीजाती नाजूक केली, म्हणून तिच्याकरितां हीं मोठमोठालीं घरें, दारें, वाडें, हवेल्या, बागबगीचे, धनद्रव्य, वस्त्रप्रावर्ण, ऐषआराम दिलें, तुम्हाला सडेफटिंगाला कोण पुसतो ? पोर ना बाळ. कोठें झाडाखाली पडलां, तरी सारखेंच. तेव्हां ही अर्धांगी शक्ति आहे. पाहूं बरें तुम्हाला अर्धांग वायु होऊन अर्धे शरीर जर गेलें, तर मग एका हातानें तुम्ही काय कराल ? हें सर्व सृष्टिमात्र त्या आदिमाया महाशक्तीनें उत्पन्न करून या स्त्रीजातीचे अंगी आपले सारखी चंचलता, सामर्थ्य देऊन हा संसाराचा गाडा तिलाच हांकण्यास लाविलें. त्यांतून तुमचें काम एकच, गाडा तुम्ही भरावा ; पुढें तो हाकून त्याची सर्व व्यवस्था लावणें तिच्याकडे, अशी ही स्त्रीजाती एक प्रती-शक्तीच आहे. तिच्यावाचून तुम्हांला शोभा, मोठेपणा, जय हे कांहींच नाहीं. दूर कशाला ? ज्या घरांत ती नाहीं तें घर केवळ स्मशानासारखें ओसाड दिसतें. मग तो एक मोठा सर्व संपत्तीनें भरलेला राजवाडा का असेना ; त्याला तीच कळा.

पण जेथें ती वास करील, ती मोडकी तीन वाशांची झोपडी जरी असली, तरी एक मोठें शोभिवंत घवघवीत मंदिरच दिसेल. याकरितांच स्त्रियांना लक्ष्मी असें म्हणतात. तेव्हां असा सुक्ष्म विचार केला, म्हणजे ज्या ब्रम्हदेवानें हा स्त्रीरूपी विषवत अमृततुल्य सर्व पुरुषमात्रास मोहरुपाने बंधन करणारा प्राणी उत्पन्न केला, त्याबद्दल त्यासं दोष न देतां उपकार मानणें जरूर पडेल. ह्या तर गायीपेक्षांही अशक्त आहेत.

परमश्वरानें गायीस संरक्षणासाठी भाल्यासारखी तीक्ष्ण शिंगे व वाघासारख्याही बलाढ्य क्रूर पशुपासून दूर पळून जाण्याकरितां चार पाय व हरिणासारखी चपळ गती दिली आहे. पण यांना तर तेंही नाहीं.

तसेंच तुम्हालाही कांहीं शिंगे किंवा आत्मरक्षणाकरितां घोड्यासारखे चार पाय व गती दिली नाहीं ; परंतु फक्त एक विशाल बुध्दि देऊन त्यानें तुम्हाला या सृष्टीतील सर्व प्राणिमात्रांस पशुपक्ष्यांत श्रेष्ठ केलें आहें. तर तुम्हीं त्या श्रेष्ठ-पदास शोभेल असें वर्तन करावें. पण छे तसें कसें होईल. यांत श्रेष्ठ तुमचे जे ब्रम्हदेव त्यांनी तरी काय बोलाल, ते कुठें साधू आहेत. ते तर तुमच्या पेक्षां सव्वाईच आहेत.

शंकरानीं तपश्चर्या सोडून भिलीणी मागें धांव घेतली. विश्वामित्रानीं तर कुत्र्याचा आवतार घेतला. यांनी तर कमालच केली. तेव्हांपासूनच तुम्हाला कुत्र्याची उपमा देतात. असो, पाहूं गेले असतां, देवांतच चंद्र, इंद्र, पुष्कळ सांपडतील. तेथें मानवाची काय कथा ?

याकरितां प्रथम तुम्ही तुमची मनें गच्च विवेकाचे खांबास बांधून भिष्माचार्याचें व्रत घ्या. तुम्ही आपले मदोन्मत कामगज कर्दळी-वनांत सोडून पायाखालीं तुडवूं नका. तुम्ही सदाचरणानें प्रथम वागा ; म्हणजे सर्व सुखच व आनंदच आनंद होऊन या जगांत घरोघर निष्कलंक पातिवृत्याचें निशाण उंच उडून चंद्राला देखील लज्जा आणील कीं नाहीं, हें पहा.

तरी स्त्रियास अगदींच आमर्याद मनमानेल तशी मोकळीस असावी असें अगदींच म्हणणें नाही.

आशिक्षित, अज्ञानी, निर्बल अशा जरी त्या आहेत, तरी त्यानीं आपल्या द्दढ निश्चयाचे बळानें सदा सदाचरणीं आग्नीसारखे शुचिर्भूत अंतरबाह्य निर्मळ राहून पुरुष जातीस लाजवून खाली पहाण्यास लावावें, या वेगळें त्यांच्या लक्ष्मी या नांवास साजण्याजोगें दुसरें भूषणच नाहीं. तर या सदा पतिव्रता सदाचरणी बाण्यानें दोन्ही कुलांत बिजलीप्रमाणें चमकत राहण्याकरितां व त्यांचे सुकीर्तीचे ध्वज दोन्ही कुलमंदिरावर उंच उडविण्याकरितां

सर्व मुलाबाळासुध्दां लक्ष्मीच्या पूर्ण वैभवांत त्यांना नांदवून, सर्वास प्रिय होऊन, सौभाग्याचा मळवट कपाळीं भरून त्यांचा संसार शेवट गोड होऊन इहलोकीं व परलोकीं त्यांना सुस्थळ मिळण्याकरितां आनादिसिध्द, परमकृपाळु, दयानिधि, करुणाकर, कृपासागर, दिनबंधु जगनियंत्या परमेश्वराची प्राथर्ना यांचें कल्याण होण्याकरितां मनापासून करून हा निबंध संपविते.

--- समाप्त ---